- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,४१,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,३०,३५० /-
✔ चांदी : १,९८,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर
संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 Mail Id : sinhvanivrutta@gmail.com दिनांक : गुरूवार, २९ ऑक्टोबर २०२६ Epaper : epaper.sinhvani.com पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३१९ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

राज्यात महायुतीला तीन जागांवर पराभवाचा धक्का

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघात अभिजीत वंजारी विजयी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर/पुणे

विधान परिषद निवडणुकीचा निकाल काल जाहीर झाला. यामध्ये महाविकास आघाडीने पदवीधरच्या ३ पैकी ३ जागा जिंकल्या, मराठवाड्यात महायुतीची जागा स्वतःकडे खेचली; सत्ताधारी महायुतीने शिक्षकांच्या दोन्ही जागा जिंकल्या, पुण्याची काँग्रेसची पारंपरिक जागा भाजपने १८ वर्षानंतर आपल्याकडे खेचून आणली, तर पाचपैकी फक्त दोन जागा मिळाल्याने आता काही नेत्यांनी याबाबत नाराजी व्यक्त करत आत्मचिंतन करण्याची गरज असल्याचं मत स्पष्ट केलं आहे, तर भारतीय जनता पक्षाचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी या निवडणुकीच्या निकालानंतर आता महायुतीला प्रश्न केला आहे. सोशल मिडीयावरती पोस्ट करत केशव उपाध्ये यांनी पाच जागांच्या निकालानंतर तरी महायुती म्हणून आत्मचिंतन करणार आहोत का? असा सवाल केला आहे. एकत्रित लढलो असतो तर पाचही जागा जिंकण्याची सहज शक्यता असताना दोन वर का थांबलो याचा विचार करणार आहोत का? असंही पुढे म्हटलं आहे. पदवीधर आणि शिक्षकच्या निवडणुकीत जिंकलेल्या कमी जागा आणि महायुतीमध्ये सोडलेल्या जागा यावरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष आणि खासदार प्रफुल पटेलांनी पक्षाला घरचा आहेर दिला, त्यांनी सोशल मिडीयावर पोस्ट करत म्हटलं की, आजचे विधान परिषदेचे निकाल हा एक स्पष्ट आणि महत्त्वाचा इशारा आहेत. लोकांचा विश्वास पुन्हा संपादन करण्यासाठी, पक्षाचे प्राधान्यक्रम नव्याने ठरवण्यासाठी आणि संघटनेत सुधारणा करण्यासाठी तातडीने आणि कठोर आत्मपरीक्षण करावे लागेल.



नागपुरच्या लढतीकडे सर्वांचे लक्ष

नागपूर विभाग विधान परिषद पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत इंडियन नॅशनल काँग्रेसचे उमेदवार अभिजीत वंजारी यांनी विजय मिळविला. त्यांना प्रथम व द्वितीय पसंतीक्रमाची एकूण ६७ हजार २३१ मते मिळाली. तर त्यांचे निजिकचे प्रतिस्पर्धी भारतीय जनता पाटीचे सुधाकर कोहळे यांना ६३ हजार ९६० मते मिळाली. निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी अभिजित वंजारी यांना विजयाचे प्रमाणपत्र प्रदान केले. नागपूरच्या मानकापूर येथील विभागीय क्रीडा संकुलात मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर रोजी सकाळी आठ वाजता ८४ टेबलवरून मतमोजणीला सुरुवात झाली. ४१ पेक्षा जास्त तासांपासून ही मतमोजणी सुरू होती. यावेळी निवडणूक निरीक्षक डॉ.हर्षदीप कांबळे, निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, विभागातील सर्व जिल्ह्याचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.
पहिल्या पसंतीच्या दोन फेऱ्यांमध्ये कोणत्याही उमेदवाराला विजयासाठी आवश्यक ७५ हजार ४३८ मतांचा कोटा पूर्ण करता आला नाही. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेनुसार द्वितीय पसंतीक्रमाची बाद फेरी घेण्यात आली. पहिल्या पसंतीच्या दोन फेऱ्यांमध्ये १ लाख ६५ हजार ९०६ मतांपैकी १५ हजार ३२ मते अवैध ठरली. तर १ लाख ५० हजार ८७४ मते वैध ठरली. द्वितीय पसंतीच्या बाद फेऱ्यामध्येही कुठल्याही उमेदवाराला निर्धारित कोटा पूर्ण करता आला नाही. त्यामुळे पहिल्या व द्वितीय पसंतीक्रमाच्या बाद फेरी मिळून सर्वाधिक ६७ हजार २३१ मते घेणाऱ्या अभिजित वंजारी यांना विजयी घोषीत करण्यात आले.
भारत निवडणूक आयोगाने नागपूर विभाग विधान परिषद पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीचा कार्यक्रम २२ सप्टेंबर रोजी जाहीर केला होता. त्यानुसार २९ सप्टेंबर रोजी निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान झाले. या निवडणुकीची मतमोजणी २७ ऑक्टोबर सकाळी ८ वाजता सुरू झाली. ४१ तासांनंतर मतमोजणी प्रक्रिया पूर्ण झाली. निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याचे वेळापत्रक आयोगाने निश्चित केले आहे.

मतांनी पराभव

राज्याचे लक्ष लागलेल्या पुणे विभाग पदवीधर मतदारसंघातील अटीतटीच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या हर्षदा देशमुख-जाधव यांनी दणदणीत विजय मिळवला. प्रदीर्घ मतमोजणीनंतर ४४ व्या बाद फेरीत विजयासाठी आवश्यक मतांचा कोटा पूर्ण करत त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार स्मिता जाधव यांचा ९९२८ मतांनी पराभव केला. हर्षदा देशमुख-जाधव यांना अखेर १ लाख १३ हजार ८४० मते मिळाली, तर स्मिता जाधव यांना १ लाख ३ हजार ९१२ मतांवर समाधान मानावे लागले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजप उमेदवारासाठी जोरदार प्रचार करूनही या जागेवर विजय मिळवता आला नाही.

पुणे शिक्षक: १८ वर्षांनंतर भाजपने जागा खेचली; कौस्तुभ गावडे सर्वात तरुण आमदार

पुणे विभाग शिक्षक मतदारसंघात भाजपचे कौस्तुभ गावडे यांनी अखेर १८ वर्षांच्या खंडानंतर पुन्हा एकदा भारतीय जनता पक्षाचा झेंडा फडकवण्यात यश मिळवले. गावडे यांनी शिदेसेना पुरस्कृत अपक्ष उमेदवार सचिन सानप यांचा तब्बल ६ हजार ७७० मतांनी पराभव केला. एकूण वैध मतांमधून विजयासाठी २५ हजार ७५६ मतांचा कोटा निश्चित करण्यात आला होता. २७ बाद फेऱ्यांनंतर गावडे यांना २३ हजार १७७ मते मिळाली, तर त्यांचे प्रतिस्पर्धी सानप यांना १६ हजार ३४७ मते मिळाली. कौस्तुभ गावडे हे या मतदारसंघातून आजवर निवडून आलेले सर्वात तरुण उमेदवार ठरले आहेत. विद्यमान आमदार काँग्रेसचे जयंत आसगावकर हे या शर्यतीत चौथ्या क्रमांकावर फेकले गेले.

औरंगाबाद पदवीधर: चव्हाणांना मोठा धक्का, डॉ. प्रतापसिंह पाटील विजयी

औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) विभाग पदवीधर मतदारसंघात अत्यंत चुरशीच्या झालेल्या सामन्यात राष्ट्रवादी (शरद पवार गट) उमेदवार डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी बाजी मारली. यामुळे विद्यमान आमदार अजित पवार गटाचे सतीश चव्हाण यांच्या १८ वर्षांपासूनच्या मतदारसंघावरील वर्चस्वाला मोठा धक्का बसला आहे. दुसऱ्या पसंतीची मते मोजल्यानंतर सतीश चव्हाण यांना ६०९३५ मते, तर प्रतापसिंह पाटील यांना ७४१४२ मते मिळाली. १३२०७ मतांची भक्कम आघाडी घेत पाटील यांनी विजय साकारला.

अमरावतीत पोहेरांचा पराभव, शिंदेसेनेचे सरनाईक पुन्हा विजयी

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात महायुतीमधील शिंदेसेनेचे किरण सरनाईक दुसऱ्या पसंतीक्रमाच्या अखेरच्या बाद फेरीत विजयासाठी आवश्यक १६१३४ मतांचा कोटा पार करत विजयी झाले. त्यांनी महाविकास आघाडीच्या प्रा. अदिती पोहेरे यांचा पराभव करत आपला मतदारसंघ कायम राखला. सरनाईक यांनी पहिल्या पसंतीपासूनच आघाडी घेतली होती; मात्र विजय साकारण्यासाठी त्यांना २४ व्या बाद फेरीपर्यंत संघर्ष करावा लागला. तब्बल ३२ तास सुरू असलेल्या मतमोजणीत त्यांनी १६६६३ मते मिळवून विजय मिळवला.

थोडक्यात

केरळमध्ये दहशतवादी कट

कोची : केरळमधील कोची येथे ऐतिहासिक ज्यू सिनेगॉगच्या (प्रार्थना स्थळाच्या) समोर १२ ऑक्टोबर रोजी झालेल्या आगलाव्याला पोलिसांनी मोठ्या दहशतवादी कटाचा भाग असल्याचे म्हटले आहे. पोलिसांच्या मते, ३२ वर्षीय आरोपी एबिन पॉलने ही आग लावली होती.
कोची शहराचे पोलीस आयुक्त कलिराज महेश कुमार यांनी सांगितले की, १२ ऑक्टोबरच्या सकाळी करण्यात आलेला हा हल्ला एक टेस्ट केस होता. आरोपीला प्रथम कोचीत स्वतःला सिद्ध करण्यास सांगण्यात आले होते. याच कारणामुळे पॉलने पेट्रोल ओतून आग लावल्यानंतर आपल्या मोबाइलवर या घटनेचा व्हीडीओही बनवला होता. त्यानंतर त्याला इतर राज्यांमध्ये मोठे हल्ले करण्याची जबाबदारी देण्याची योजना होती. आयुक्तांच्या मते, या कटात एकापेक्षा जास्त लोक सहभागी होते. एका हँडलरने पॉलला विशिष्ट कामे दिली होती आणि त्याला क्रिप्टोकरन्सीद्वारे पैसे पाठवण्यात आले होते. पोलिसांचे म्हणणे आहे की, त्याने यापूर्वी एर्नाकुलम जिल्ह्यातील मुवत्तुपुझा येथेही अशाच प्रकारे आगलाव्या केल्या होत्या.
कमिशनर कुमार यांनी पुढे सांगितले की, आरोपीला एक हँडलर निर्देश देत होता आणि त्याला क्रिप्टोकरन्सीद्वारे पेमेंट केले जात होते. आरोपीला टेलिग्रामवर बॉस नावाने सेव्ह केलेल्या संपर्काकडून निर्देश मिळत होते. चौकशीत आरोपीने विक्रम नावाच्या व्यक्तीचा उल्लेख केला आहे. पोलिस दोघांची ओळख निश्चित करत आहेत. आरोपीच्या पुण्यातील शिक्षणाशी आणि पार्श्वभूमीशी संबंधित पैलूंचीही चौकशी केली जात आहे.

सुदानमध्ये भीषण ड्रोन हल्ल्यात १२० ठार

खारटौम : सुदानमध्ये सुरू असलेल्या गृहयुद्धादरम्यान लष्कराने केलेल्या भीषण ड्रोन हल्ल्यात १२० हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला असून ११३ जण जखमी झाले आहेत. दक्षिण दारफूरची राजधानी असलेल्या न्याला शहरातील एका गजबजलेल्या बाजारावर सोमवारी संध्याकाळी हा प्राणघातक हल्ला करण्यात आला. इमर्जन्सी लॉयर्स या स्थानिक मानवाधिकार संघटनेने मंगळवारी या घटनेची माहिती दिली. मानवाधिकार संघटनेने दिलेल्या माहितीनुसार, बाजारात नागरिकांची मोठी गर्दी असताना अचानक ड्रोनद्वारे बॉम्बवर्षाव करण्यात आला. यामुळे संपूर्ण बाजारपेठेत रक्ताचा सडा पडला होता. या हल्ल्यात बळी पडलेल्यांमध्ये महिला आणि लहान मुलांची संख्या सर्वाधिक आहे. या संघटनेने या भीषण हल्ल्याचा तीव्र निषेध करत सुदानी लष्कराला जबाबदार धरले असून, आंतरराष्ट्रीय स्तरावर या घटनेची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी केली आहे.
आंतरराष्ट्रीय वैद्यकीय संस्था डॉक्टर्स विदाऊट बॉर्डर्स ने सांगितले की, त्याला येथील त्यांच्या रुग्णालयात ३६ मृतदेह आणण्यात आले होते, तर सुमारे ११३ जखमींवर आपत्कालीन कक्षात उपचार सुरू आहेत. त्याला शहरावर सध्या निमलष्करी दल रॅपिड सपोर्ट फोर्सेस चे नियंत्रण आहे. एप्रिल २०२३ पासून सुदानी लष्कर आणि आरएसएफ यांच्यात देशाच्या सत्तेवरून रक्तरंजित संघर्ष सुरू आहे. दोन्ही बाजूंनी स्फोटकांनी भरलेल्या ड्रोनचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढवला असून रुग्णालये, शाळा, बाजारपेठा, धरणे आणि निर्वासितांच्या छावण्यांना सातत्याने लक्ष्य केले जात आहे. संयुक्त राष्ट्रांनीही या वाढत्या ड्रोन हल्ल्यांमुळे नागरिकांच्या जीवावर ओढवलेल्या संकटाबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

बोथली येथे सेवानिवृत्त प्राध्यापकाचा संशयास्पद मृत्यू, हत्येचा संशय

शेतातील फार्महाऊस परिसरात आढळला ६२ वर्षीय चंद्रशेखर भास्कर दहीकर यांचा मृतदेह, विटेने हल्ला केल्याचा प्राथमिक संशय, पोलिसांकडून तपास सुरू



दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव

गोंदिया जिल्ह्यातील आमगाव तालुक्यातील बोथली येथे सेवानिवृत्त प्राध्यापक चंद्रशेखर भास्कर दहीकर (वय ६२) यांचा संशयास्पद परिस्थितीत मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मंगळवार, २७ ऑक्टोबर रोजी सकाळी त्यांच्या शेतातील फार्महाऊस परिसरात त्यांचा मृतदेह आढळून आला. त्यांच्यावर विटेने हल्ला करून हत्या करण्यात आली असावी, असा प्राथमिक संशय व्यक्त केला जात आहे. ही घटना सोमवारच्या रात्री घडल्याची माहिती आहे.
३६ वर्षे प्राध्यापक म्हणून सेवा चंद्रशेखर भास्कर दहीकर हे भवभूती महाविद्यालयात भौतिकशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. सन १९८६ मध्ये त्यांची नियुक्ती झाली होती. त्यानंतर त्यांनी सुमारे ३६ वर्षे अध्यापनाचे कार्य केले. सेवानिवृत्तीनंतर ते बोथली येथे वास्तव्यास होते आणि शेतीची कामे सांभाळत होते.

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडून घटनास्थळाची पाहणी

या घटनेची माहिती मिळताच गोंदिया जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक गोरख भामरे, अप्पर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, उपविभागीय पोलीस अधिकारी नंदिनी चानपुरकर आणि आमगावचे पोलीस निरीक्षक निलकंठ कुकडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तपासाला सुरुवात केली आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, आमगाव पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला असून, घटनेमागील कारणांचा शोध घेतला जात आहे.

मृत्यूचे गूढ उकलण्याचे पोलिसांसमोर आव्हान

दहीकर यांचा मृत्यू नेमका कोणत्या परिस्थितीत झाला, त्यांच्यावर प्रत्यक्षात हल्ला झाला होता का आणि या घटनेमागे कोणते कारण आहे, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. संशयित आरोपीची ओळखही अद्याप पटलेली नाही. त्यामुळे या प्रकरणातील मृत्यूचे गूढ उकलण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.
या प्रकरणातील मृत्यूचे नेमके कारण आणि इतर महत्त्वाचे तपशील शवविच्छेदन अहवाल तसेच पोलीस तपासातून स्पष्ट होणार आहेत. सध्या हत्येची शक्यता व्यक्त केली जात असली, तरी तपास पूर्ण होऊन अधिकृत निष्कर्ष समोर येईपर्यंत या घटनेबाबत कोणताही अंतिम निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही.

संजय राऊतांना १७ नोव्हेंबरला सर्वोच्च न्यायालयात हजर राहण्याचे आदेश

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

सर्वोच्च न्यायालयाने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांना १७ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्याबाबत सोशल मीडियावर त्यांनी आक्षेपार्ह विधान केले होते. आता त्यांच्याविरोधात न्यायालयाचा अवमान केल्याची कारवाई सुरू आहे. या प्रकरणात पत्रकार निखिल वागळे यांनाही न्यायालयाने उपस्थित राहण्यास सांगितले आहे. मात्र, वागळे यांना पुढील सुनावणीला ऑनलाइन उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात आली आहे.



न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि न्यायमूर्ती विपुल एम. पांचोली यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. या प्रकरणाचा संबंध केवळ संबंधित व्यक्तींशी नसून संपूर्ण न्यायव्यवस्थेशी आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. भारतीय सर्वोच्च न्यायालयाबाबत सोशल मीडियावर करण्यात आलेल्या विधानांमुळे न्यायालयाची प्रतिष्ठा कमी होत असल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या वकिलांच्या संघटनेने या प्रकरणी याचिका दाखल केली आहे. त्यासाठी भारताच्या अॅटर्नी जनरल यांनी लेखी संमती दिली होती.

निखिल वागळेंनी मागितली बिनशर्त माफी

सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी विरोधी पक्षांच्या नेत्यांना भेटण्यास नकार दिल्यानंतर निखिल वागळे यांनी सोशल मीडियावर आक्षेपार्ह टिप्पणी केली होती. त्यानंतर त्यांनी बिनशर्त माफी मागितली आणि संबंधित पोस्ट हटवली. मात्र, पोस्ट हटवण्यासाठी पाच दिवसांचा विलंब झाल्याचे याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. वागळे यांच्यावतीने ज्येष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांनी बाजू मांडली. वागळे यांनी आपल्या कृतीचे समर्थन केलेले नाही आणि त्यांना आपल्या विधानाचा पश्चात्ताप आहे, असे त्यांनी सांगितले. वागळे मुंबईत राहत असल्याने त्यांना ऑनलाइन उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात आली. गरज पडल्यास भविष्यात त्यांना प्रत्यक्ष हजर राहण्यास सांगितले जाऊ शकते.

संजय राऊतांना प्रत्यक्ष उपस्थित राहावे लागणार

सुनावणीदरम्यान संजय राऊत यांच्या बाजूने कोणताही वकील उपस्थित नव्हता. त्यामुळे न्यायालयाने त्यांना पुढील सुनावणीला प्रत्यक्ष हजर राहण्याचे निर्देश दिले. राऊत यांनी न्यायाधीश राजकीय कार्यक्रमांना उपस्थित राहतात आणि मुख्यमंत्र्यांकडून आयोजित मेजवान्यांना जातात, असे आरोप केल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. न्यायाधीशांबाबत लंडनमधील बॅडमिंटन खेळाच्या कथित फोटोंचा उल्लेख करण्यात आला होता. या संदर्भातील काही दावे खोटे असल्याचे दिल्ली उच्च न्यायालयाने यापूर्वी म्हटल्याचा उल्लेखही याचिकेत आहे.

दैनिक सिंहवाणी वृत्त Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : गुरूवार, २९ ऑक्टोबर २०२६

संपादकीय लेखणीतून...

वृक्षतोडीवरून जनरोष

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात प्रस्तावित टोरेंट पॉवरच्या पंप स्टोरेज प्रकल्पावरून राज्यातील राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. प्रकल्पासाठी सुरू असलेल्या वृक्षतोडीवरून जनरोष उसळला आहे. शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी घटनास्थळी पाहणी करून सत्ताधाऱ्यांवर कडक टीका केली. साई डोंगर परिसरात सुमारे ३ हजार मेगावॅट क्षमतेचा टोरेंट जलविद्युत प्रकल्प होऊ घातला आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ९३२ एकर क्षेत्राचा वापर होणार असून त्यात अंदाजे ६०० एकर वनक्षेत्र आणि ३३२ एकर खासगी जमिनींचा समावेश आहे. टोरेंट कंपनीच्या साई डोंगर-१ प्रकल्पासाठी २० ऑक्टोबरपासून सुरू झालेल्या वृक्षतोडीमुळे स्थानिकांमध्ये चिंता वाढली आहे. पहिल्या टप्प्यात सुमारे ३२ हजार झाडे तोडण्याचे नियोजन आहे. या वृक्षतोडीला ग्रामस्थ आणि पर्यावरणप्रेमींनी विरोध केला असून राजकीय नेत्यांनीही निषेध नोंदवला आहे. साई डोंगर परिसरातील आदिवासी वाडीपासून पुढील जंगलात इलेक्ट्रिक कटरने झाडे तोडली जात आहेत. या बेसुमार वृक्षतोडीवर कर्जतच्या पर्यावरण बचाव समितीने हरकत घेतली आहे. सामान्य माणसाने एखादे झाड तोडले तर त्याच्यावर कारवाईचा बडगा उगारला जातो; मात्र कुठलीही ठोस परवानगी नसताना इतक्या मोठ्या प्रमाणात वृक्षतोड कशी केली जाते? असा प्रश्न समितीने केला आहे. गुजरात राज्यातील टोरेंट पॉवर कंपनी साई डोंगर भागात ३ हजार मेगावॅट क्षमतेचा जलविद्युत प्रकल्प उभारणार असून त्यासाठी १३ हजार ५०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. प्रकल्पासाठी ३७० हेक्टर जागेची गरज असून त्यापैकी २३३ हेक्टर हे वनक्षेत्र तर १४४ हेक्टर बिगर वनक्षेत्र आहे.

पेज नदीवर हा प्रकल्प उभारण्यात येणार असून त्यासाठी २ धरणांची निर्मिती केली जाणार आहे. डोंगरमाथ्यावरील धरणाची उंची २७ मीटर तर खालच्या धरणाची उंची ५९ मीटर असणार आहे. प्रकल्पासाठी भालीवाडी, आंबोट, पोतळ, पाली, साई डोंगर, धाक या गावातील जमिनी संपादित केल्या जाणार आहेत. भूसंपादन आणि पुनर्वसनाचे काम अद्याप झालेले नसले तरी प्रकल्पाचे काम सुरू करण्यासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. प्रकल्पाचे भूमिपूजन पंतप्रधान मोदी यांच्या उपस्थितीत होण्याची शक्यता असून ३ नोव्हेंबर रोजी प्रकल्पाचा पायाभरणी समारंभ होऊ शकतो. वन विभागाने या प्रकल्पासाठी जमीन दिल्याचे कोणतेही पत्र उपलब्ध नाही. मग कंपनी अथवा प्रशासन मनमानी पद्धतीने झाडांची कत्तल करणी करू शकते? असा प्रश्न पर्यावरण बचाव समितीने उपस्थित केला आहे. यामुळे ही वृक्षतोड तातडीने थांबवावी अन्यथा पर्यावरण बचाव समितीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. आवश्यक नसताना कोणतीही वृक्षतोड करू नये ही राज्य शासनाच्या वन विभागाची आणि केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागाची कायमच मूलभूत भूमिका राहिलेली आहे. जर संबंधित प्रकल्पासाठी दुसऱ्या प्रकल्पावर काम करणे शक्य असेल तर जंगलाचा नाश होण्यापासून वाचवलेच पाहिजे आणि वृक्षतोड कशी टाळता येईल, याचा शास्त्रशुद्ध अभ्यास केला पाहिजे, अशा शब्दांत भाजपचे नेते आणि माजी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सत्ताधारी भाजपला घरचा आहेर दिला.

विकासाच्या नावाखाली सह्याद्रीच्या जंगलांचा ऱ्हास सुरू असेल तर तो रोखण्यासाठी जनतेने एकत्र आले पाहिजे, असे आवाहन अभिनेते आणि पर्यावरणप्रेमी सयाजी शिंदे यांनी केले आहे. जुनी झाडे तोडून नवी झाडे लावण्याचा दिखावा कशासाठी? सह्याद्रीतील नैसर्गिक संपत्ती, जुनी झाडे आणि वन्यजीवांचे अधिवास वाचवण्यासाठी सेव्ह सह्याद्री ही मोहीम उभारणार आहोत. या प्रकल्पासाठी झाडांचा बळी देण्याऐवजी पर्यावरणाला कमीत कमी हानी पोहोचेल, अशा पर्यायांचा विचार करावा. भारतातील जंगलांपैकी ५ टक्के जंगल जमीन सह्याद्रीत आहे. येथील वाहत्या नद्या, झाडे, डोंगर यामुळे पाऊस येऊन त्या पाण्यावर महाराष्ट्र जगत आहे; मात्र आता त्याच जागेवर टोरेंट प्रकल्प आणला जात आहे. शंभर-दीडशे वर्षांपूर्वीची जुनी झाडे आणि पशुपक्ष्यांची घरे उद्ध्वस्त करून काय साध्य होणार आहे? असा सवाल शिंदे यांनी केला.

नवजात अभ्रकाचा जन्मदात्यांनाच विटाळ?

लीलाधर दवंडे
कामठी (नागपूर)

मुलं ही देवाघरची फुलं असतात असे म्हटल्या जाते. लहान मुलांच्या लीलांचे तर अनेक जण कौतुक करत असतात. शेजारी असलेली लहान मुलं, प्रवासात भेटलेली गोजिरवाणी मुलं पाहून मन प्रसन्न होऊन जातं. कुठल्या दाम्पत्यांना मुलबाळ नसलं की त्यांना होणारा त्रास, त्यांच्या जीवाची घालमेल त्यांनाच ठाऊक असतो. एकतरी मुल होऊ दे म्हणून कित्येक दाम्पत्य डॉक्टरांकडे वेरझारा घालतात, नवस धुपारे बोलतात. लहान मुलांच्या कौतुकाला न जात आडवी येत आणि ना कुठला धर्म आडवा येत असतो. कुणाच्या पोटी मृत बाळ जन्माला आलं तर जन्मदात्या जाऊन पोहचला तरी आपल्याकडील माणसांच्या मनातून विटाळ काही केल्या जात नाही. काही काळापूर्वी माणूसच माणसाचा विटाळ मानायचे. त्यासाठी समाजसुधारकांना जीवाचे रान करावे लागले. कायदे करावे लागले. तरी सुद्धा माणसाचा विटाळ मानून घेणारी एक दुर्दैवी घटना नुकतेच समाज माध्यमांवर झळकत असलेल्या वृत्तपत्राच्या कात्रणातून पुढे आली. ऐन नवरात्रीच्या पावन आणि मंगल उत्सवात संभाजी नगरमध्ये घडलेल्या या घटनेने समाजमन सुन्न होऊन गेलं आहे. लिहित्या हातांना विचार करायला भाग पाडलं आहे. नऊ महिने पोटात सांभाळलेल्या बालकाचा एका दिवसातच दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना संभाजी नगरच्या गजानन महाराज मंदिर परिसरातील एका खासगी दवाखान्यात घडली. दैवाने असा खेळ कुणाशीही खेळू नये. मात्र, त्या एक दिवसाच्या निष्पाप जीवाचा कुठलाही दोष नसतांना नवरात्री सुरू असल्याने त्याच्या स्वतःच्या आई वडिलांनी त्यास स्पर्श करण्याने नाकारतांना मायेची ममता कुठे आटली म्हणावी? 'आमच्यामध्ये बाळ आणि बाळंतिणीला हात लावत नाही. त्यामुळे आम्ही कुठलाही विधी करू शकत नाही ' असे कारण मृत बाळाच्या वडिलाने सांगितल्याने शेवटी स्मशानभूमीच्या कर्मचाऱ्यांनीच त्या नवजात अभ्रकाला नेऊन त्यावर अंत्यसंस्कार केले. जिथे परके धावून आले आणि जन्मदाते विटाळ मानायला लागले, त्या घरी तो बालक नाही राहिला तेच बरे केले. एखाद्या वानरीचे पिल्लू मृत झाले तरी ते हृदयाशी कवटाळून ठेवते. एखाद्या गाईचे वासरू मरण पावले तर तिचे दूध काढतांना त्या मृत वासराच्या आत तणस किंवा भूसा भरून तिच्यापुढे ठेवले जाते. आणि इथे मात्र सर्व प्राणीमात्रांत बुद्धिवान समजला जाणारा मानव आपल्या पोटी जन्माला आलेले बाळ एकच दिवसात मृत झाले असता त्याचा स्पर्श करणे सुद्धा टाळतो, म्हणजे त्याच्या बुद्धीची कीव करावी तितकी थोडीच आहे.

निदान अंत्यसंस्कार करत पर्यंत तरी त्या अभाग्या बालकाला थोडावेळ का होईना मायेचा स्पर्श मिळाला असता तर त्याच्या आत्म्याला शांती लाभली असती. मात्र, जात पात, ओवळ्या सोवळ्याच्या आणि नको त्या रुढी परंपरांच्या जाळ्यात गुंतलेल्या माणसाला स्वतःच्या पोटच्या गोळ्याचा सुद्धा विटाळ होत असेल तर अशांना मातृकळा नाही अनुभवायला मिळाल्या त्याच बरे. नवजात अभ्रकाचा विटाळ मानणाऱ्या अशा दांपत्याची कूस वांझच राहिलेली बरी.

- ८४१२८७७२२०

मतपेटीतून क्रांती : सर्बियात विद्यार्थी शक्तीचा ऐतिहासिक विजय

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

युरोप खंडातील बाल्कन क्षेत्रात वसलेल्या सर्बिया या देशाने जागतिक लोकशाहीच्या आणि राजकीय इतिहासातील एक अत्यंत सुवर्णपान नुकतेच कोरले आहे. गेल्या दीड दशकाहून अधिक काळ देशाच्या राजकारणावर, प्रशासनावर आणि प्रसारमाध्यमांवर एकाधिकारशाही गाजवणारे राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर वुचिच आणि त्यांच्या अत्यंत प्रभावशाली मानल्या जाणाऱ्या उजव्या विचारसरणीच्या पक्षाला देशातील सर्वसामान्य जनतेने आणि विशेषतः तरुणांनी सतेवरून अक्षरशः खाली खेचले आहे. सलग १४ वर्षे सत्तेत राहिल्यामुळे वुचिच यांच्यावर सर्व सत्ता स्वतःच्या आणि आपल्या मोजक्या निकटवर्तीयांच्या हाती केंद्रित केल्याचा, तसेच देशातील प्रसारमाध्यमांची गळचेपी करून हुकूमशाहीकडे वाटचाल करत असल्याचा आरोप सातत्याने होत होता. मात्र, प्रस्थापित विरोधी पक्ष अत्यंत कमकुवत असल्याने त्यांना आव्हान देणारे कोणीही शिल्लक राहिले नव्हते.

अशा अत्यंत कोंडीच्या आणि नैराश्याच्या वातावरणात, कोणत्याही प्रस्थापित राजकीय नेत्याने नव्हे, तर देशातील तरुण आणि विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन लोकशाहीच्या मार्गाने एक अभूतपूर्व आणि शांततापूर्ण राजकीय क्रांती घडवून आणली आहे. एका मोठ्या आणि वेदनादायी शोकातिकेतून उभा राहिलेला जनतेचा तीव्र असंतोष जेव्हा अतिशय संयमाने आणि एकाच प्रमुख मागणीसाठी देशातील हजारो विद्यार्थी पहिल्यांदा रस्त्यावर उतरले.

सुरुवातीला या आंदोलनाची फारशी दखल न घेणाऱ्या सरकारने नंतर दडपशाहीचा वापर करून हा आवाज दाबण्याचा आटोकाट प्रयत्न केला. मात्र, विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारच्या हिंसेला किंवा प्रलोभनांना बळी न पडता, प्रचंड संयम दाखवत सलग २ वर्षे हे आंदोलन अतिशय शांततापूर्ण मागनि जिवंत ठेवले. हळूहळू या आंदोलनाला समाजातील सर्वच स्तरांतून प्रचंड पाठिंबा मिळू लागला आणि एका साध्या न्याय मागणीच्या आंदोलनाने एका व्यापक, देशव्यापी राजकीय आणि सामाजिक चळवळीचे अवाढव्य रूप धारण केले.

केवळ रस्त्यावर मोर्चे काढून, निदर्शने करून आणि घोषणाबाजी करून ही प्रस्थापित आणि भ्रष्ट व्यवस्था मुळापासून बदलणार नाही, याची जाणीव या तरुण आंदोलकांना झाली. त्यामुळे व्यवस्थेच्या बाहेर राहून लढण्याऐवजी, थेट व्यवस्थेत शिरून लोकशाहीच्या सर्वोच्च मार्गाने म्हणजेच मतपेटीच्या माध्यमातून निवडणुका लढवण्याचा एक अत्यंत धाडसी आणि ऐतिहासिक निर्णय या विद्यार्थ्यांनी घेतला. त्यानुसार, २५ ऑक्टोबर २०२६ रोजी पार पडलेल्या सार्वत्रिक आणि अत्यंत अटीतटीच्या संसदीय निवडणुकांमध्ये या विद्यार्थी आघाडीने आपला एक पूर्णपणे वेगळा आणि स्वच्छ मार्ग चोखाळला. विशेष म्हणजे, या आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्वतः सत्तेची खुर्ची मिळवण्याचा मोहाला बळी न पडता, देशातील अत्यंत अभ्यासू, तज्ज्ञ आणि चारित्र्यवान व्यक्तींना पुढे केले. त्यांनी देशातील नामांकित प्राध्यापक, आंतरराष्ट्रीय दर्जाचे अर्थशास्त्रज्ञ, निष्णात इंजिनिअर्स, समाजसेवक, डॉक्टर आणि ऑलिम्पिक खेळाडू अशा एकूण २५० अत्यंत स्वच्छ प्रतिमेच्या व्यक्तींची एक अनोखी उमेदवारी यादी तयार केली.

या सर्व उमेदवारांना यापूर्वीची कोणतीही राजकीय किंवा गुन्हेगारी पार्श्वभूमी नव्हती. याच विद्यार्थी आघाडीच्या आणि स्वच्छ उमेदवारांच्या यादीला सर्बियाच्या जनतेने आपला भरभरून आणि ऐतिहासिक कौल दिला. या निवडणुकीत सर्बियाच्या जनतेने आपला वर्षानुवर्षांचा दबलेला संताप मतपेटीतून व्यक्त करत तब्बल ७० टक्के इतके विक्रमी आणि डोळे दिपवणारे मतदान केले. निवडणुकीचे निकाल सत्ताधाऱ्यांसाठी अत्यंत धक्कादायक आणि विद्यार्थी आघाडीसाठी स्वप्नवत ठरले. सर्बियाच्या संसदेतील एकूण २५० जागांपैकी नवीन सरकार स्थापन करण्यासाठी १२६ जागांची आवश्यकता असते. मात्र, विद्यार्थी आघाडीने तब्बल १४१ जागांवर घवघवीत विजय मिळवून स्पष्ट, निर्विवाद आणि एकहाती बहुमत मिळवले. त्यांना एकूण मतदानापैकी तब्बल ५२.९ टक्के मते मिळाली. याउलट, स्वतःला अजिंक्य समजणाऱ्या आणि प्रदीर्घ काळ सत्तेत असलेल्या वुचिच यांच्या पक्षाला केवळ १०३ जागांवर आणि ३८.८ टक्के मतांवर समाधान मानावे लागले.

आपला इतका दारुण आणि अनपेक्षित पराभव झाल्यानंतर, राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर वुचिच यांनी आपला नेहमीचाच बचावात्मक पवित्रा घेत यामागे परकीय शक्तींचा मोठा हात असल्याचा अत्यंत खळबळजनक आरोप केला. या जनआंदोलनाला आणि निवडणुकीतील विजयी विरोधी आघाडीला अमेरिकेतील काही पडद्यामागच्या शक्ती, क्रोएशिया, मॉंटेनेग्रो आणि काही युरोपीय देशांनी मोठ्या प्रमाणावर आर्थिक रसद आणि गुप्त पाठिंबा पुरवल्याचा दावा त्यांनी पराभव स्वीकारताना केला. आंतरराष्ट्रीय राजकारणात वुचिच यांना रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांचे अत्यंत जवळचे मित्र आणि खरे समर्थक मानले जात असे, त्यामुळेच पाश्चात्य देशांनी आपल्याला जाणीवपूर्वक लक्ष केल्याची आणि सत्तेतून हटवल्याची त्यांची ठाम धारणा होती. मात्र, दुसरीकडे या ऐतिहासिक सत्तांतरामुळे सर्बियाच्या राजधानी बेलग्रेडसह देशाच्या कानाकोपऱ्यातील रस्त्यांवर, चौकांमध्ये आणि गल्ल्यांमध्ये नागरिकांनी अभूतपूर्व असा जल्लोष आणि आनंदोत्सव साजरा केला.

१४ वर्षे एका घुसमटीच्या आणि हुकूमशाहीच्या छायेत वावरणाऱ्या जनतेसाठी हा खऱ्या अर्थाने एक मोकळा श्वास होता. लोक रस्त्यांवर एकमेकांना मिठी मारून, हसून आणि अश्रू ढाळून या नव्या स्वातंत्र्याचे स्वागत करत होते. बेलग्रेडमधील स्थानिक रहिवासी द्रागाना कोवाचेविच यांच्यासारख्या असंख्य सामान्य नागरिकांनी, आता आपला देश हुकूमशाहीच्या अंधकारातून बाहेर पडून एका सामान्य, मुक्त आणि स्वतंत्र लोकशाही देशाच्या दिशेने वाटचाल करत असल्याच्या अत्यंत भावूक प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

या ऐतिहासिक आणि अत्यंत महत्त्वपूर्ण निकालानंतर सर्बियाच्या परराष्ट्र धोरणात आणि देशांतर्गत राजकारणात अतिशय मोठे आणि दूरगामी बदल होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

आतापर्यंत रशियाच्या प्रभावाखाली झुकलेला हा देश आता अतिशय वेगाने युरोपीय महासंघाच्या दिशेने आणि प्रगत पाश्चात्य लोकशाहीच्या दिशेने वाटचाल करेल, अशी अपेक्षा जागतिक राजकीय विश्लेषकांकडून व्यक्त केली जात आहे. जगातील इतर अनेक देशांतील हुकूमशाही सरकारे आणि तिथे सुरू असलेली जनआंदोलने या दोघांसाठीही सर्बियाचा हा मतपेटीतून मिळालेला लोकशाहीचा महाविजय एक अत्यंत महत्त्वाचा, दिशादर्शक आणि कधीही न विसरता येणारा धडा ठरला आहे.

- ९५६१५९४३०६

वेलिंग्टनमध्ये विंडी वादळापेक्षा ठरला भयानक अभिषेक वैभवचा झंझावात!

डॉ. दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

सलामीवीर अभिषेक शर्माच्या धमाकेदार शतकाच्या जोरावर भारताने न्यूझीलंडविरुद्धचा तिसरा टी२० सामना जिंकला. या विजयासह भारतीय संघाने मालिकेत ३-० अशी अभेद्य आघाडी घेतली. शर्माने ३५ चेंडूंमध्ये शतक झळकावले, जे त्याच्या कारकिर्दीतील चौथे टी-२० आंतरराष्ट्रीय शतक आहे. यापूर्वी त्याने अफगाणिस्तानविरुद्ध ३० चेंडूंमध्ये शतकही केले होते.

भारताविरुद्ध न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करत १९८ धावा केल्या. डॅरिल मिचेलने शानदार फलंदाजी करत नाबाद ८९ धावा केल्या. तथापि, वैभव सूर्यवंशी आणि अभिषेकने धडाकेबाज सुरुवात करत पॉवरप्लेमध्येच भारतीय संघाचा विजय निश्चित केला. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील संघाने हा सामना सहा गडी राखून जिंकला आणि मालिकेत ३-० अशी अभेद्य आघाडी घेतली.

फिन एलन आणि डॅरिल मिचेल यांची अप्रतिम फलंदाजी

नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करावी लागल्यानंतर किवी संघाची सुरुवात चांगली झाली नाही. अर्शदीप सिंगने टिम सायफर्टला दोन धावांवर बाद केले. मात्र, त्यानंतर फिन एलन आणि डॅरिल मिचेल यांनी सूत्रे हाती घेतली. त्यांनी भारतीय गोलंदाजांची धुलाई केली. नितीश कुमार रेड्डीच्या गोलंदाजीवर फिन एलन ४० धावांवर बाद झाला.

डॅरिल मिचेल शेवटपर्यंत खेळपट्टीवर टिकून राहिला. त्याने शानदार फलंदाजी करत अर्धशतक झळकावले. मिचेलने २६ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. मात्र, शेवटच्या षटकांमध्ये भारतीय गोलंदाजांनी आपल्या गोलंदाजीत सुधारणा केली आणि धावगती कमी केली. मिचेलने ५२ चेंडूंमध्ये नाबाद ८९ धावा केल्या. न्यूझीलंडने १९८ धावा केल्या.

बेवन जेकब्सनेही शानदार फलंदाजी करत २३ चेंडूंमध्ये नाबाद ३९ धावा केल्या. प्रथम फलंदाजी करताना किवी संघाने तीन गडी गमावून १९८ धावा केल्या. भारताकडून अर्शदीप सिंग, अक्षर पटेल आणि नितीश कुमार रेड्डी यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

अभिषेक शर्मा आणि वैभव सूर्यवंशी यांची वादळी सुरुवात

न्यूझीलंडच्या १९९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना टीम इंडियाने वादळी सुरुवात केली. मागील सामन्यात तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या वैभव सूर्यवंशीला डावाची सुरुवात करण्यासाठी पाठवण्यात आले. या जोडीने वादळी सुरुवात केली आणि टीम इंडियाने पॉवरप्लेमध्ये ११८ धावा केल्या. यादरम्यान, अभिषेक शर्माने अवघ्या १५ चेंडूंमध्ये अर्धशतक पूर्ण केले. वैभवला अर्धशतक पूर्ण करता आले नाही आणि तो ४५ धावा करून बाद झाला.

अभिषेक शर्माचे शतक

वेलिंग्टनमध्ये न्यूझीलंडविरुद्ध खेळताना, अर्धशतक झळकावल्यानंतरही अभिषेक शर्माची बॅट चमकत राहिली. त्याने ३५ चेंडूंमध्ये शतक पूर्ण केले. टी-२० मध्ये भारताकडून हे संयुक्तपणे दुसरे सर्वात वेगवान शतक आहे. रोहित शर्मानेही श्रीलंकेविरुद्ध ३५ चेंडूंमध्ये शतक झळकावले. यापूर्वी, अभिषेक शर्माने ३० चेंडूंमध्ये शतक झळकावले होते, जे या फॉरमॅटमधील भारताचे सर्वात वेगवान शतक ठरले. त्याने ३७ चेंडूंमध्ये नऊ चौकार आणि ११ षटकारांसह ११३ धावा केल्या.

भारताने सामना जिंकला

भारताने १३.२ षटकांत चार गडी गमावून १९९ धावांचे लक्ष्य पूर्ण केले. या विजयासह भारताने मालिकाही जिंकली. शतक झळकावणाऱ्या अभिषेक शर्मालाही सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. वेलिंग्टन येथे न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या टी२० सामन्यात भारतीय सलामीवीर अभिषेक शर्मा आणि वैभव सूर्यवंशी यांनी अनेक विक्रम मोडले. या जोडीने वेलिंग्टनच्या मैदानावर अनेक विक्रम रचत टीम इंडियाला धमाकेदार सुरुवात करून दिली. यादरम्यान, टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यात कोणत्याही संघाने सर्वात जलद अर्धशतक झळकावले.

भारताविरुद्ध प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडने १९८ धावा केल्या, ज्या टीम इंडियाने १३.२ षटकांत पूर्ण केल्या. यादरम्यान, भारतीय संघाने केवळ ५ षटकांत १०० धावा पूर्ण केल्या. इतकेच नाही, तर त्यांनी पॉवरप्लेमध्ये एकही गडी न गमावता ११८ धावा केल्या. अभिषेक शर्माने शतक झळकावले, तर वैभव सूर्यवंशी ४५ धावा करून बाद झाला.

भारतीय संघाने विश्वविक्रम रचला

भारतीय संघाने २.२ षटकांत आपल्या ५० धावांचा टप्पा गाठला. कोणत्याही संघाने केलेले हे संयुक्तपणे सर्वात जलद अर्धशतक आहे. भारतीय संघाने किवीज विरुद्ध पहिल्याच चेंडूपासून आक्रमक खेळी सुरू केली आणि प्रतिस्पर्धी संघाला सावरण्याची संधीच दिली नाही. वेगवान सुरुवात करत भारताने २.२ षटकांत आपल्या ५० धावा पूर्ण केल्या. पापुआ न्यू गिनी आणि रोमानिया या संघांनीही तितक्याच षटकांत आपल्या ५० धावा पूर्ण केल्या आहेत.

टी- २० आंतरराष्ट्रीय सामन्यांमधील सर्वात जलद सांघिक अर्धशतक (षटकांमध्ये) -

पपुा न्यू गिनी - २.२ विरुद्ध वानुआतु, २०१९
रोमानिया - २.२ विरुद्ध सर्बिया, २०२१
भारत - २.२ विरुद्ध न्यूझीलंड, २०२६
फिलिपिन्स - २.३ विरुद्ध इंडोनेशिया, २०२३
न्यूझीलंड - २.४ विरुद्ध स्कॉटलंड, २००९
न्यूझीलंड - २.४ विरुद्ध इंग्लंड, २०१९
दक्षिण आफ्रिका - २.४ विरुद्ध वेस्ट इंडिज, २०२३
अभिषेक-वैभव जोडीची कामगिरी

भारताने ५० धावा पूर्ण केल्यानंतरही अभिषेक शर्मा आणि वैभव सूर्यवंशी यांची स्फोटक फलंदाजी सुरूच राहिली. त्यांच्या स्फोटक फलंदाजीमुळे भारताने अवघ्या ५ षटकांत १०० धावा पूर्ण केल्या. टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमधे कोणत्याही संघाने केलेले हे सर्वात जलद शतक आहे. भारताने रोमानियाला मागे टाकले, ज्यांनी २०२१ मध्ये ५.२ षटकांत १०० धावा पूर्ण केल्या होत्या.

टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील संघाचे सर्वात जलद शतक (षटकांमध्ये):

भारत - ५ षटके विरुद्ध न्यूझीलंड, २०२६
रोमानिया - ५.२ षटके विरुद्ध सर्बिया, २०२१
दक्षिण आफ्रिका - ५.३ षटके विरुद्ध वेस्ट इंडिज, २०२३
ऑस्ट्रेलिया - ५.३ षटके विरुद्ध स्कॉटलंड, २०२४
झिम्बाब्वे - ५.५ षटके विरुद्ध गाबिया, २०२४
इंग्लंड - ५.५ षटके विरुद्ध दक्षिण आफ्रिका, २०२५

अभिषेक-वैभवचे पॉवरप्लेमधील वादळ

भारतीय संघाने न्यूझीलंडविरुद्ध पॉवरप्लेमध्ये एकही गडी न गमावता ११८ धावा केल्या. टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यातील पॉवरप्लेमधील ही सर्वोच्च धावसंख्या आहे. यापूर्वी हा विक्रम रोमानियाच्या नावावर होता.

टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमधील पॉवरप्लेमधील सर्वोच्च धावा

भारत - ११८/० विरुद्ध न्यूझीलंड, २०२६
रोमानिया - ११६/० विरुद्ध सर्बिया, २०२१
ऑस्ट्रेलिया - ११३/१ विरुद्ध स्कॉटलंड, २०२५
झिम्बाब्वे - १०३/१ विरुद्ध गाबिया, २०२४
दक्षिण आफ्रिका - १०२/० विरुद्ध वेस्ट इंडीज, २०२३

या सामन्यापूर्वी वेलिंग्टनमध्ये ताशी ७० ते १२० किलोमिटर वेगाने वारे वाहत होते. हे वादळ सामन्याला प्रभावीत करेल व त्याचा फायदा यजमान संघालाच होईल अशी सर्वत्र चर्चा होती मात्र ती सगळी फोल ठरवत भारताच्या सलामी दुकलीने विंगी वादळाच तडीपार करत यजमानांना अक्षरशः गुडघ्यावर आणले.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

प्लॅस्टिव्हिजन इंडिया २०२६ ठरणार जगातील दुसऱ्या क्रमांकाचे प्लास्टिक प्रदर्शन

एआयपीएमएतर्फे नागपुरात जागतिक व्यावसायिक संधींचे सादरीकरण, २१ ते २५ जानेवारीदरम्यान मुंबईत भव्य आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

प्लास्टिक उद्योगाचे प्रतिनिधित्व करणारी भारतातील सर्वात जुनी आणि प्रमुख शिखर संस्था असलेल्या ऑल इंडिया प्लास्टिक्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनतर्फे (एआयपीएमए) मंगळवारी हॉटेल सेंटर पॉइंट येथे विशेष उद्योग मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी 'प्लॅस्टिव्हिजन इंडिया २०२७' या आंतरराष्ट्रीय प्लास्टिक प्रदर्शनाच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या व्यावसायिक संधी, आधुनिक तंत्रज्ञान आणि जागतिक बाजारपेठेतील संभावनांची माहिती देण्यात आली. हे प्रदर्शन २१ ते २५ जानेवारी २०२७ या कालावधीत मुंबईतील बॉम्बे एक्झिबिशन सेंटर येथे होणार आहे.

२०२७ मध्ये जगातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे प्लास्टिक व्यापार प्रदर्शन ठरण्याच्या दिशेने वाटचाल करणारे 'प्लॅस्टिव्हिजन इंडिया २०२७' भारतीय उद्योगांना आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान पुरवठादार, खरेदीदार, गुंतवणूकदार आणि नव्या बाजारपेठांशी जोडणारे आहे. यामुळे जागतिक उत्पादन केंद्र म्हणून भारताची स्थिती अधिक मजबूत होण्यास मदत मिळेल.



या उद्योग मेळाव्याला नागपूरच्या महापौर नीता ठाकरे आणि आरसी प्लास्टो टँक्स अँड पाइप्सचे संचालक नीलेश अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. नागपूरचे माजी महापौर आणि भारतीय जनता पक्षाच्या नागपूर शहराचे अध्यक्ष दयाशंकर तिवारी विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

एआयपीएमएच्या प्रतिनिधींची उपस्थिती

एआयपीएमएचे माजी अध्यक्ष आणि 'प्लॅस्टिव्हिजन इंडिया २०२७'च्या जॉब फेअर व माजी विद्यार्थी मेळावा समितीचे अध्यक्ष किशोर संपत, एआयपीएमएच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य आणि एमएसएमई वित्त सहाय्य समितीचे (सिडबी/बँका) अध्यक्ष राज मिर्जे, तसेच व्यवस्थापन समितीचे सदस्य आणि नोंदणी समितीचे अध्यक्ष अक्षत लढ्ढा यांनी या मेळाव्यात संस्थेचे प्रतिनिधित्व केले.

या उपक्रमाला नागपुरात विदर्भ प्लास्टिक उत्पादक संघटनेचे (व्हीपीएमए) सहकार्य लाभले. संघटनेचे मानद अध्यक्ष अजय अग्रवाल आणि मानद सचिव वैभव अग्रवाल उपस्थित होते..

प्लास्टिक उद्योगाच्या संपूर्ण मूल्यसाखळीला एकाच व्यासपीठावर आणणार

एआयपीएमएच्या आयोजनाखाली होणाऱ्या या आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि परिषदेत प्लास्टिक उद्योगाच्या संपूर्ण मूल्यसाखळीतील घटक सहभागी होणार आहेत. यामध्ये कच्चा माल, यंत्रसामग्री, मोल्ड्स, प्रक्रिया तंत्रज्ञान, तयार उत्पादने आणि पूरक सेवांचा समावेश असेल. प्रगत तंत्रज्ञानाची माहिती, व्यावसायिक भागीदारी आणि देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठांचा शोध घेण्यासाठी हे प्रदर्शन महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे.

भारतातील प्लास्टिक उद्योगात सुमारे ९४ हजार प्रक्रिया उद्योग कार्यरत असून, या क्षेत्राचे वार्षिक उत्पादनमूल्य सुमारे ९ लाख कोटी रुपये (९७ अब्ज अमेरिकी डॉलर) आहे. या उद्योगातून सुमारे ५० लाख लोकांना रोजगार मिळतो. भारतातील दरडोई प्लास्टिक वापर सुमारे १६ किलो असून, आंतरराष्ट्रीय सरासरी ५० किलो आहे. त्यामुळे या क्षेत्रात विकास, नवकल्पना आणि गुंतवणुकीसाठी मोठ्या संधी उपलब्ध आहेत.

'प्लॅस्टिव्हिजन इंडिया २०२७'मध्ये २१ समांतर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये शाश्वतता व पुनर्चक्रण, ऑटोमेशन व इंडस्ट्री ४.०, स्टार्टअप्स, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) तसेच आंतरराष्ट्रीय व्यावसायिक सहकार्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

मागील प्रदर्शनात ८४ देशांतील व्यावसायिकांचा सहभाग

डिसेंबर २०२३ मध्ये आयोजित प्लॅस्टिव्हिजन इंडियाच्या १२व्या आवृत्तीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. या प्रदर्शनात २० देशांतील १,२३८ प्रदर्शक सहभागी झाले होते. तसेच ८४ देश आणि भारतातील ६०० शहरांमधून एकूण २ लाख ३४ हजार व्यावसायिक अभ्यागतांनी भेट दिली होती.

याशिवाय, २६ देशांतील १०२ निवडक आंतरराष्ट्रीय खरेदीदार सहभागी झाले होते. त्यांच्या निवासाची व्यवस्थाही विनामूल्य करण्यात आली होती. मागील प्रदर्शनाच्या यशाच्या पार्श्वभूमीवर २०२७ मधील आवृत्तीत आंतरराष्ट्रीय सहभाग वाढविणे, भारतीय उत्पादकांना जागतिक बाजारपेठांपर्यंत पोहोचविणे आणि त्यांची स्पर्धात्मक क्षमता बळकट करणे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

१०० हून अधिक आंतरराष्ट्रीय व्यापार प्रदर्शनांतून प्रचार

प्लॅस्टिव्हिजन इंडिया २०२७चा भारतासह परदेशातही व्यापक प्रचार करण्यात येत आहे. यासाठी १०० हून अधिक प्रमुख आंतरराष्ट्रीय व्यापार प्रदर्शनांमध्ये सहभाग घेतला जात आहे. या उपक्रमामुळे जागतिक तंत्रज्ञान पुरवठादार, आंतरराष्ट्रीय खरेदीदार आणि नव्या व्यावसायिक संधी भारतीय प्लास्टिक उद्योगाच्या अधिक जवळ येतील.

प्लॅस्टिव्हिजन इंडिया २०२७चे मानद अध्यक्ष जयेश खिमजी रंभिया म्हणाले, प्लॅस्टिव्हिजन हे केवळ व्यापार प्रदर्शन नाही, तर भारतीय प्लास्टिक उद्योगाच्या विकासातील एक महत्त्वाचा भागीदार आहे. भारतीय उद्योगांना जागतिक तंत्रज्ञान, बाजारपेठा आणि संधींशी जोडून नवकल्पना, स्पर्धात्मकता आणि जागतिक स्तरावर प्रगती साधण्यास हे व्यासपीठ मदत करते.

प्लॅस्टिव्हिजन इंडिया २०२७ हे प्रदर्शन २१ ते २५ जानेवारी २०२७ या कालावधीत मुंबईतील बॉम्बे एक्झिबिशन सेंटर येथे होणार आहे. प्लास्टिक उद्योगातील उद्योजक, उत्पादक आणि व्यावसायिकांना आधुनिक तंत्रज्ञान, धोरणात्मक भागीदारी आणि विकासाच्या नव्या संधी उपलब्ध करून देणारे हे प्रदर्शन ठरणार आहे.

थोडक्यात

किसान मित्र फाउंडेशनच्यावतीने तहसील कार्यालय काटोल समोर धरणे आंदोलन



दै. सिंहवाणी वृत्त, काटोल

किसान मित्र फाउंडेशन च्या वतीने मंगळवार दिनांक २७ ऑक्टोंबर रोजी तहसील कार्यालय काटोल समोर धरणे आंदोलन व उपोषण प्रारंभ करण्यात आले आहे. त्या विषयाची निवेदन चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नावाने सायंकाळी चार वाजता काटोल तहसीलमध्ये देण्यात आलेले आहे. यामध्ये प्रमुख मागण्या खालील प्रमाणे आहेत. शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी जानेवारी २०२४ पासून बंद केलेला विद्युत पुरवठा परत पूर्ववत देण्यात यावा. गाव नकाशावर नोंद असलेले शेत रस्ते व शिव रस्त्यावरील अतिक्रमण तात्काळ हटविण्यात यावे. महसूल कायद्यानुसार तसेच शासनाच्या एसओपीनुसार शेतकऱ्यांना न्याय न देता हेच रस्त्याविषयी प्रकरण प्रलंबित ठेवल्यास संबंधित अधिकाऱ्यावर दप्तर दिरंगाई कायद्याअंतर्गत शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी. मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंद रस्ते विषयी वेळोवेळी घेतलेल्या शासन निर्णयांची अंमलबजावणी करण्यात यावी.

निवेदन देतेवेळी संजय डांगोरे माजी सभापती पंचायत समिती काटोल, सागर दुधाने जिल्हाध्यक्ष क्रांतिकारी शेतकरी संघटना, दिगंबर डोंगरे बहुजन नेते, अजय लाडसे उपसभापती खरेदी विक्री संघ काटोल, अश्विनीताई नागमोते सरपंच ग्रामपंचायत आजनगाव, प्रमोद मोहोड संस्थापक किसान मित्र फाउंडेशन, सतीश जी चव्हाण तालुका अध्यक्ष काँग्रेस पार्टी, निशिकांत नागमोते माजी सभापती पंचायत समिती काटोल, नंदू भाऊ राजूरकर किसान सेल राष्ट्रवादी पक्ष, नरेंद्रजी डोंगरे जिल्हाध्यक्ष आरपीआय, तेजस करोळे प्रभारी काटोल विधानसभा क्षेत्र, वीरेंद्र इंगळे यांची उपस्थिती होती.

सनातन धर्माला कोणीही संपवू शकत नाही!, ज्ञानेश्वर महाराज टापरे यांचे प्रतिपादन



दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

सनातन धर्माची परंपरा भक्ती, श्रद्धा आणि सत्यावर आधारित असून, कितीही संकटे आली तरी सनातन धर्माला कोणीही संपवू शकत नाही, असे प्रतिपादन भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज टापरे यांनी केले. दत्तवाडी येथील मंगलधाम सोसायटीमध्ये दिनकर महाराज कावडकर यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त २५ ऑक्टोबरपासून श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ व अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे. यावेळी भक्त प्रल्हादाच्या चरित्राचे निरूपण करताना महाराजांनी भक्तीची शक्ती आणि अधर्मावर धर्माच्या विजयाचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे आयोजन लोमेश, शारदा, आशुतोष व तेजश्री कावडकर यांनी केले आहे. कथेला परिसरातील भाविकांची उपस्थिती लाभत आहे.

वाडीत साईलीला कार्यक्रमात भजनसंध्या उत्साहात, ७०० साईभक्तांनी घेतला महाप्रसादाचा लाभ



दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

शुभम नाटकर मित्रपरिवाराच्यावतीने वाडीत आयोजित साई लीला धार्मिक कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला. यावेळी इंदूर येथील छोटा शिर्डी धाम दरबारचे साई श्रद्धानंदजी पराशर गुरुजी यांची विशेष उपस्थिती होती. नाटकर परिवार व नगरवासीयांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमात साईबाबांच्या भक्तिगीतांची भजन संध्या रंगली. यामुळे परिसर साईमय झाला. कार्यक्रमाच्या समारोपानंतर आयोजित महाप्रसादाचा सुमारे ७०० भाविकांनी लाभ घेतला. यावेळी वाडी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष नरेश चरडे, डॉ. राहुल ठवरे, नगरसेवक हर्षल काकडे, राजेश थोरने, सरपंच ज्योत्स्ना सुजित नितनवरे, विजय मिश्रा, भीमराव भोरकर व रजनीकांत अतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शुभम राजाभाऊ नाटकर व मित्रपरिवाराने परिश्रम घेतले.

चाचेर परिसरात पावसाच्या सरी

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू: मौदा : आज बुधवार (ता.२८ ऑक्टोबर)ला पहाटेपासूनच आभाळ ढगांनी आच्छादलेला होता.



सायंकाळी ४ वाजता दरम्यान चाचेर परिसरात पाच मिनिटे जोरदार पावसाच्या सरी कोसळल्या. त्यानंतर पावसाच्या रिपरिप ला सुरुवात झाली. आज चाचेरचा आठवडी बाजार असल्याने सायंकाळी ४ वाजता दरम्यान आलेल्या जोरदार पावसाच्या सरींमुळे दुकानदाराची चांगली तारांबर उडाली होती. शेतातील धुऱ्यावर तुरी लावलेल्या शेतकऱ्यांच्या तुरी पिकाला चांगलाच फायदा होणार असल्याचे नेरला येथील प्रगतशील शेतकरी किसना कोरमोरे यांनी त्यांच्या घरी वार्तालाप करताना सांगितले. वंदा गहू पिकाला पेचचे पाणी मिळणार नाही, तरी मी शेतात आज आलेल्या अशाच नैसर्गिक पाण्याच्या अंदाजावर अवलंबून गहू पीक घेणार असल्याचे कोरमोरे यांनी सांगितले.

ईएमआरएस रामटेकचा राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत डंका! १५ सुवर्ण पदकांसह १७ पदके



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

नेस्ट व आदिवासी विकास विभाग नाशिक द्वारा आयोजित आणि एकलव्य आदर्श निवासी विद्यालय, शेंडेगाव जि. ठाणे येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा २०२६-२७ मध्ये एटफर रामटेकच्या विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक कामगिरी केली आहे.

या स्पर्धेत आमच्या शाळेच्या खेळाडूंनी एकूण १७ पदके पटकावली आहेत. यामध्ये १५ सुवर्ण पदके, १ रौप्य पदक आणि १ कांस्य पदक यांचा समावेश आहे. विद्यार्थीमध्ये कु. माही सुरपाम (३ सुवर्ण पदक), बास्केटबॉल टिम मुले व मुली १० सुवर्ण योगा सुवर्ण १ उरजस्वी नारनवरे, अरमान सिडाम १ सुवर्ण या दमदार कामगिरीमुळे EMRS रामटेकने राज्य पातळीवर आपल्या शाळेचे नाव उज्वल केले आहे. सर्व विजेत्या खेळाडूंचे शाळा प्रशासन, प्राचार्या रुपा बोरेकर आणि क्रीडा शिक्षक व कर्मचारी यांनी त्याचे हार्दिक अभिनंदन केले आहे. स्पोर्ट्स मॅडम, EMRS रामटेक यांनी सांगितले की, "विद्यार्थ्यांनी कठोर सराव आणि मेहनतीने हे यश संपादन केले आहे. पुढील राष्ट्रीय स्तरावरही असेच यश मिळवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत." या यशाबद्दल सर्व

कायदा व वाहतूक सुव्यवस्थेसाठी पोलिसांचे वेधले लक्ष!

श्री संताजी तेली समाज संघटनेने दिले निवेदन

दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

श्री संताजी अखिल तेली समाज संघटन वाडी शाखेद्वारे नितीन मगर वरीष्ठ पोलिस निरीक्षक पोलिस स्टेशन वाडी यांचा वाडीतील शांतता सुव्यवस्था आणि वाडी परीसरातील चोरी प्रकरणातील व महीलांची छेडखानी करणाऱ्या चोरांना पकडुन वाडीतील जनतेमध्ये भीतीमुक्त वातावरण निर्माण केल्याबद्दल त्यांचा प्रथम शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

दरम्यान वाडीतील ट्राफिकच्या व नागरीकांच्या समस्या पोलीस अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून आठवा मैल, दत्तवाडी, खडगाव वळण,भाजी मार्केट, दाभा चौक, छत्रपती शिवाजी



महाराज प्रतिमा रोड या ठिकाणी चुकीच्या पद्धतीने ऑटो व इतर वाहने थांबतात त्यामुळे वाहतुकीला अडथळा होतो. त्यामुळे पोलिसांची दिवसभरातून दोन वेळा तरी गस्त ठेवावी. दत्तवाडी मुख्य मार्गावर सायंकाळी रस्त्यावर वाहने उभे राहतात त्यामुळे वाहतूक व नागरिकांना त्रास होतो या ठिकाणी देखील संध्याकाळी फिरती गस्त ठेवावी. छोटी मुले मोठ्या प्रमाणात दुचाकी वाहन वेगवान चालवताना शहरातुन सर्रासपणे आढळून येत आहे, यावर आपल्या माध्यमातून नियंत्रण ठेवावे.

दिवाळीच्या काळात मोठ्या प्रमाणात दुकानदार दुकानाच्या बाहेर रस्त्यापर्यंत अतिक्रमण करून व्यवसाय करतात त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतुकीला अडथळा होतो. या बाबतीतही आता पासूनच जनजागृती करावी. सार्वजनिक मैदानावर मोठ्या प्रमाणात रात्रीच्या वेळेला काही मुले अयोग्य पद्धतीने वागणूक करताना आढळून येत आहे कृपया पोलीस गस्त घालून अशा प्रकरणाला आळा घालावा. महामार्गावरील अपघात झाले असता गाडीचे फुटलेले काचे तसेच पडुन राहतात त्यामुळे गाड्या पंक्चर होवुन अपघात होतात.यावर उपाययोजना करावी.

श्री संताजी अखिल तेली समाज संघटन वाडीचे पदाधिकारी वरीष्ठ सल्लागार गोविंद रोडे, प्रशांत बुटले, दिपक अवचट माजी उपनिरीक्षक,डॉ हर्षय प्रभाकर थोराने, मोतीराम शहारे, ज्ञानेश्वर वंजारी समाजसेवक, अनिल बजाईत प्रदेशाध्यक्ष, रोशन वैद्य शहर उपाध्यक्ष वाडी, सुधाकर वाघ ओबीसी वरीष्ठ समाजसेवक, चेतन वरटकर यांनी या जनसमस्यावर कार्यवाहीची विनंती केली आहे.

एंडोस्कोपिक निदानावर आधारित 'डायग्नोकॉन-२६' राष्ट्रीय परिषद संपन्न

देशभरातील २०० प्रतिनिधींचा सहभाग, आधुनिक निदान पद्धती आणि उपचार प्रक्रियेवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

रोगनिदान क्षेत्रातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे निदान कौशल्य अधिक विकसित करण्याच्या उद्देशाने रोगनिदान विकृतीविज्ञान पीजी असोसिएशन, नागपूर च्यावतीने 'डायग्नोकॉन-२६' या एंडोस्कोपिक निदानावर आधारित चौथ्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन २५ ऑक्टोबर रोजी आर. टी. एम.नागपूर विद्यापीठ परिसरातील गुरुनानक भवन येथे करण्यात आले. देशभरातून सुमारे २०० प्रतिनिधींनी या परिषदेत सहभाग घेतला. आधुनिक निदान पद्धती, प्रत्यक्ष प्रक्रियांचे प्रात्यक्षिक आणि विविध आजारांच्या उपचार व्यवस्थापनाबाबत तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या



परिषदेला महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, पारुल युनिव्हर्सिटी (वडोदरा), स्वामीनारायण युनिव्हर्सिटी (कलोल) आणि संकलचंद पटेल युनिव्हर्सिटी (गुजरात) यांची मान्यता होती. परिषदेत नागपूरचे गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. प्रतीक पडोळे यांनी 'गॅस्ट्रोस्कोपी : निदानात्मक अर्थनिर्वचन आणि उपचारात्मक हस्तक्षेप' या विषयावर मार्गदर्शन केले.

डॉ. सौरभ पटले यांनी कोलोनोस्कोपी : निदान आणि उपचारात्मक हस्तक्षेप, तर डॉ. सिद्धार्थ धांडे यांनी जठरांत्र विकारांच्या निदान आणि उपचारांमध्ये एंडोस्कोपिक अल्ट्रासाऊंडची भूमिका स्पष्ट केली. डॉ. शुभंकर गोडबोले यांनी कॅप्सूल एंडोस्कोपीच्या माध्यमातून निदान व उपचारात्मक हस्तक्षेपाबाबत माहिती दिली. याशिवाय, कान -नाक- घसा तज्ज्ञ डॉ. अजय देशपांडे यांनी ईएनटी विकारांमध्ये एंडोस्कोपीचे महत्त्व विशद केले. स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. पवन गुल्हाने यांनी हिस्टेरोस्कोपीच्या निदानात्मक आणि उपचारात्मक उपयोगांवर मार्गदर्शन केले.

सर्व तज्ज्ञांनी संबंधित प्रक्रियांची कार्यपद्धती, आजारांचे अचूक निदान आणि रुग्णांच्या उपचार व्यवस्थापनाबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह माहिती दिली. उपस्थित प्रतिनिधींनी सर्व व्याख्यानांचे कौतुक केले. परिषदेचे अध्यक्ष आणि RVPGA चे अध्यक्ष डॉ.सुभाष वाघे यांनी सांगितले की, रोगनिदान विषयातील निदान पद्धतींवर असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेली ही चौथी राष्ट्रीय परिषद आहे. पदव्युत्तर विद्यार्थ्यांना आधुनिक निदान तंत्रज्ञानाची ओळख व्हावी, त्यांचे व्यावहारिक ज्ञान वाढावे आणि निदान कौशल्य अधिक विकसित व्हावे, या उद्देशाने दरवर्षी अशा परिषदांचे आयोजन करण्यात येते. परिषदेच्या उद्घाटन समारंभाला नागपूरचे महाराज श्रीमंत राजे मुधोजी राजे भोसले प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

आर. टी. एम. नागपूर विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण विभागाचे संचालक समित महोरे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगावचे अधिष्ठाता डॉ. संतोष चव्हाण यांची उपस्थिती होती. उद्घाटनप्रसंगी या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. डॉ. अमित नंपल्लीवार यांच्या हस्ते रोगनिदान विषयावरील पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. परिषदेत सहभागी झालेल्या सर्व प्रतिनिधींना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

यशस्वितेसाठी डॉ. विपुल कानानी, डॉ. वैशाली गणोरकर, डॉ. अविनाश राडके, डॉ. अभिनंदन मुके, डॉ. तृप्ती यवतकर, डॉ. भाग्य रंजन दास, डॉ. हेमंत पांचाडे, डॉ. अंकुश डिकोंडवार, डॉ. दर्शना उभाळे, डॉ. स्नेहल राणे, डॉ. अमोल गुजराथी, डॉ. राजेश साव आणि डॉ. भार्गव ठाकोर यांनी विशेष परिश्रम घेतले.

थोडक्यात

'संस्कृती प्रदर्शनी २०२६' शुक्रवार, ३० ऑक्टोबरपासून

गृहपयोगी वस्तूंच्या प्रदर्शनासह विविध उपक्रमांची मेजवानी



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ, नागपूर यांच्यावतीने 'संस्कृती प्रदर्शनी २०२६' या भव्य प्रदर्शन व विक्री उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर ते रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत खामला रोड येथील गुलमोहर सभागृहात हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. प्रदर्शनाची वेळ सकाळी ११ ते रात्री ९.३० वाजेपर्यंत असून, नागरिकांसाठी प्रवेश विनामूल्य आहे. भारतीय संस्कृती, परंपरा, कला, उद्योजकता आणि सामाजिक एकात्मतेचा संगम घडविण्याच्या उद्देशाने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. गृहपयोगी वस्तू, विविध उत्पादने, सेवा, सांस्कृतिक उपक्रम आणि मनोरंजनाचा अनुभव एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणे हे या प्रदर्शनाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

३० ऑक्टोबर रोजी उद्घाटन सोहळा

शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर रोजी दुपारी १२.३० वाजता प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. निवृत्त फ्लाइट लेफ्टनंट शिवाली देशपांडे (सचिव, प्रहार समाज जागृती संस्था, नागपूर आणि डॉ. चैतन्य शेंबेकर (ओमेगा हॉस्पिटल, नागपूर)चे अध्यक्ष व संचालक) यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून विविध उद्योजक, व्यावसायिक आणि सेवा क्षेत्रातील घटकांना आपली उत्पादने व सेवा नागरिकांपर्यंत पोहोचविण्याची संधी मिळणार आहे. तसेच नागरिकांना विविध वस्तूंची माहिती घेण्यास, खरेदी करण्यास आणि विविध उपक्रमांचा अनुभव घेण्यास एक व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

तीन दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनाला नागपूरकरांनी कुटुंबीय व मित्रपरिवारासह भेट देऊन विविध स्टॉल्स, उत्पादने, सेवा आणि सांस्कृतिक उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. या आयोजनासाठी अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे संयोजक व उपाध्यक्ष अंकुश हरकरे, अध्यक्ष पराग जोशी, महिला आघाडी प्रमुख ध्येया चासकर, व्यापारी आघाडी प्रमुख मंदार चिखलीकर आणि सहसंयोजक स्वरा कर्जगावकर आणि समीर आचार्य यांच्यासह आयोजन मंडळ प्रयत्नशील आहे.

महाराष्ट्र विद्यालयात विद्यार्थ्यांना दिल्या जंतनाशक गोळ्या



दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

प्राथमिक आरोग्य केंद्र चिचोली अंतर्गत उपकेंद्र चिचोलीच्या वतीने राष्ट्रीय जंतनाशक मोहीम अत्यंत उत्साहात राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत 'महाराष्ट्र विद्यालय तथा जुनियर कॉलेज, चिचोली' येथे जाऊन विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्या खाऊ घालण्यात आल्या आणि आरोग्यविषयक मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले. या विशेष मोहिमेप्रसंगी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. किरण जाधव, तालुका आरोग्य सहाय्यक नरेंद्र भागडकर, नागपूर जिल्हा परिषदेचे विस्तार अधिकारी सुदाम चव्हाण व अक्षय वानखेडे यांनी महाराष्ट्र विद्यालयाला प्रत्यक्ष भेट दिली. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र चिचोलीच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. अश्विनी शेरे आणि आरोग्य सहाय्यक धनंजय ढोके यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमात आरोग्य सेविका तारा नायडू, आरोग्य सेवक शरद पवार व इतर आरोग्य कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद आणि आरोग्य पथकाच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांनी जंतनाशक गोळ्यांचे सेवन केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना जंतनाशकाचे आरोग्यातील महत्त्व, वैयक्तिक स्वच्छता आणि पोषणाबाबत मार्गदर्शन केले. या मोहिमेमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याची उत्तम काळजी घेतली जाऊन त्यांच्यामध्ये आरोग्यविषयक जाणीवजागृती निर्माण झाली आहे, ज्याबद्दल पालकांकडून व शाळा व्यवस्थापनाकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

प्रकाश नांदुरकर यांचे निधन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

लोकमतचे निवृत्त कर्मचारी प्रकाश उद्धवराव नांदुरकर यांचे बुधवारी हृदयविकाराने निधन झाले. ते ७० वर्षांचे होते. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा,एक मुलगी आणि मोठा आप्त परिवार आहे. नागपूर श्रमिक पत्रकार संघाचे सदस्य निवृत्त होई पर्यंत होते. अंत्ययात्रा २३६, जवाहर नगर येथील निवासस्थानाहून गुरुवारी सकाळी १० वाजता निघेल. मानेवाडा घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येतील.



१६४८ किलो खाद्यतेल जप्त

लातूर : दिवाळीचा सण आठ दिवसावर येऊन ठेपला आहे. त्यामुळे नागरीक खरेदीकडे वळत आहेत. लातूर शहरात दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर सतर्क असलेल्या अन्न व औषध प्रशासनाने धडक कारवाई करत २ लाख ६३ हजार ७४४ रूपयांचे १ हजार ६४८.४ किलो ग्राम रिफाईंड सोयाबीनचे खाद्यतेल जप्त केले आहे. त्यामुळे सणासुदीच्या दिवसात भेसळ करून ग्राहकांची फसवणूक करणाऱ्यांचे धाबे दणानले आहेत.

पुण्यात महात्मा फुले स्मारकासाठी २३० कोटींचा प्रस्ताव मान्य

मंत्रिमंडळ ओबीसी उपसमितीच्या बैठकीत निर्णय

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त पुण्यातील फुलेवाडा परिसराच्या संपूर्ण विकासासाठी २३० कोटी रुपयांच्या विकास प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या सूचनांनुसार या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत फुलेवाडा परिसराचे सुशोभीकरण करण्यासोबतच आवश्यक जमीन संपादन करून संपूर्ण परिसराचा कायापालट केला जाणार असल्याची माहिती मंत्रिमंडळ ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

मंत्रालयात समितीची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी चंद्रशेखर बावनकुळे हे होते. बैठकीस अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड तसेच इतर मागास व बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत महात्मा फुले यांच्या जयंती वर्षानिमित्त बहुजन आणि इतर मागास प्रवर्गाच्या कल्याणासाठी अनेक धोरणात्मक निर्णय जाहीर करण्यात आले. ऐतिहासिक भिडेवाडा येथील क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पहिल्या मुलींच्या शाळेचे स्मारक उभारणीचे काम येत्या तीन आठवड्यांत पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश यावेळी देण्यात आले. यासोबतच महसूल, पाणीपुरवठा आणि वनविभागासह दुष्काळ निवारणावर काम करणाऱ्या ११ प्रमुख विभागांच्या सर्व



कल्याणकारी उपाययोजना म. ज्योतिबा फुले यांच्या नावाने राबवण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्याबाबतचे स्वतंत्र शासन निर्णय लवकरच निर्गमित केले जाणार आहेत.

ओबीसी वसतिगृहे

राज्यभरातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला गती देण्यासाठी ३६ जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी ५०० क्षमतेची ओबीसी वसतिगृहे उभारण्यात येणार आहेत. यासाठी महसूल विभागामार्फत अवघ्या एक रुपया नाममात्र दराने जमीन उपलब्ध करून दिली जाणार असून, एमएसआयडीसीने या वसतिगृहांचे अधिकृत डिझाइन तयार केले आहे. तसेच भटक्या व विमुक्त जातींना विकासनिधीचा थेट लाभ मिळावा यासाठी ओबीसी बजेटमधून व्हीजेएनटीचे बजेट वेगळे करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. येत्या डिसेंबर महिन्यात होणाऱ्या अधिवेशनात वित्त विभागाकडे या स्वतंत्र बजेट हेडसाठी तरतूद मागितली जाणार आहे.

मराठा समाजासाठी स्थापन केलेल्या शिंदे समितीच्या धर्तीवर व्हीजेएनटी समाजाचे सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण करण्यासाठी आणि त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी एक स्वतंत्र अभ्यास समिती गठित केली जाणार आहे. याशिवाय सर्व शासकीय विभागांमधील ओबीसी प्रवर्गातील २७ टक्के रिक्त पदांचा अनुशेष (बॅकलॉग) तातडीने भरण्यासाठी पावले उचलली जातील. 'सारथी'च्या धर्तीवर 'महाज्योती' संस्थेची व्याप्ती वाढवून अधिक प्रभावीपणे काम केले जाईल. दरम्यान, वस्तीगृहांच्या उभारणी संदर्भातील सादरीकरणात दरांचे पुनरावलोकन करण्याचे निर्देश देण्यात आले असून, पुढील बैठकीत तीन नामांकित आर्किटेक्ट्सच्या प्लॅन व दरांची पाहणी करून अंतिम मंजुरी दिली जाणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

वक्तृत्व स्पर्धेत जि. प. उच्च प्राथमिक शाळा, पंचाळा (बु.) येथील विद्यार्थिनी कु. प्राजक्ता दूधपचारे हिचा प्रथम क्रमांक, जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

पंचाळा (बु.) : माझा आवाज-आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा जिल्हा परिषद नागपूर अंतर्गत तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत जि. प. उच्च प्राथमिक शाळा, पंचाळा (बु.) येथील विद्यार्थिनी कु. प्राजक्ता प्रकाश दूधपचारे हिने इयत्ता ६ वी ते ८ वी या गटातून प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

दिनांक २८ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता स्नेहसदन विद्यालय, शितलवाडी, रामटेक येथे माझा आवाज-आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा जिल्हा परिषद नागपूर अंतर्गत तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेत विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत कु. प्राजक्ता प्रकाश दूधपचारे हिने आपल्या वक्तृत्वकौशल्याच्या जोरावर प्रथम क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले.



प्राजक्ताच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, अजय चव्हाण व सर्व शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रवीण मोहणकर व सदस्य तसेच तिचे आई-वडील यांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले. तसेच आगामी जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेसाठी तिला शुभेच्छा दिल्या. प्राजक्ताच्या या यशामुळे शाळेचा नावलौकिक वाढला असून, तिच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

आंतरराज्यीय हवाला रॅकेटचे धागेदोरे खापरखेडा, दहेगाव रंगारीपर्यंत?

दहेगावातून २८ लाखांची सुपरबाईक अन् फॉर्च्युनर ताब्यात, पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

छत्तीसगडमधून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर काळा पैसा आणि हवालाची रक्कम पाठवणाऱ्या एका आंतरराज्यीय टोळीचा नुकताच पर्दाफाश झाला असून या रॅकेटचे धागेदोरे आता खापरखेडा पोलीस ठाणे हद्दीतील दहेगाव रंगारीपर्यंत पोहोचल्याची खळबळजनक माहिती सूत्रांनी दिली आहे छत्तीसगड पोलिसांनी ४ कोटींची रोकड जप्त केल्यानंतर खापरखेडा पोलिसांनी दहेगाव रंगारी परिसरातून छत्तीसगड पासिंग असलेली २८ लाख रुपयांची महागडी दुचाकी आणि एक आलिशान फॉर्च्युनर कार ताब्यात घेतली आहे मात्र एक आठवडा उलटूनही गुन्हा दाखल झाला नाही त्यामुळे खापरखेडा पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



छत्तीसगडमधील रायपूर येथील भानपुरी भागातून नागपूरच्या दिशेने निघालेल्या एका संशयास्पद बोलेरो मॅक्स पिकअप वाहनाची झडती घेतली असता, वाहनातील गुप्त चेंबरमध्ये लपवून ठेवलेली तब्बल ४ कोटी रुपयांची रोकड छत्तीसगड पोलिसांनी जप्त केली प्राथमिक चौकशीनुसार ही रोकड नागपूर शहरात पोहोचवून दुसऱ्या वाहनाद्वारे हवाला नेटवर्कमार्फत अन्य राज्यांत पाठवण्याची योजना आखण्यात आली होती.

या कारवाईचा थेट संबंध खापरखेडा परिसराशी जुळल्याची माहिती मिळताच खळबळ उडाली आहे. खात्रीलायक सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, खापरखेडा पोलिसांनी दहेगाव रंगारी येथून छत्तीसगड पासिंग असलेली २८ लाख रुपयांची एक सुपरबाईक आणि एक फॉर्च्युनर कार ताब्यात घेतली आहे ही दोन्ही आलिशान वाहने रायपूर येथील असल्याने या संपूर्ण प्रकरणातील संशय अधिक बळावला आहे जप्त करण्यात आलेली बोलेरो पिकअप आणि दहेगावातून ताब्यात घेतलेली वाहने एकाच सिंडिकेटची असल्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

कोट्यवधींच्या हवाला रॅकेटचा संशय आणि आंतरराज्यीय टोळीचा संबंध उघडकीस येत असताना खापरखेडा पोलिसांकडून मागील आठवडाभरापासून केवळ कागदपत्रांची तपासणी सुरू आहे असे मोघम उत्तर पोलिसांकडून दिले जात आहे इतक्या मोठ्या संशयास्पद प्रकरणात अद्याप कोणताही गुन्हा दाखल झाला नाही त्यामुळे राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चांना उधाण आले आहे. पोलिसांकडून हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न तर होत नाही ना असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. हे केवळ वाहने जप्त करण्यापुरते मर्यादित प्रकरण नसून यामागे आंतरराज्यीय काळ्या पैशांचे मोठे रॅकेट कार्यरत असल्याचे स्पष्ट दिसत आहे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी या प्रकरणाचा सखोल तपास थेट हवाला अँगलने केल्यास मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

वेतनातून मनमानी कपात; आपली बस वाहकांचा मोरभवन-२ येथे धरणे आंदोलन

लाल बावटा वाहतूक कामगार युनियनचा इशारा, मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास तीव्र आंदोलन छेडणार

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

लाल बावटा वाहतूक कामगार युनियन, आपली बस युनिट, सीटू नागपूर (महाराष्ट्र) यांच्या नेतृत्वाखाली आपली बसच्या वाहकांच्या वेतनातून कोणतीही पूर्वसूचना न देता तसेच योग्य हिशेब न देता करण्यात येत असलेल्या कपातीच्या निषेधार्थ आज मोरभवन-२ येथे धरणे आंदोलन करण्यात आले. या प्रकारामुळे वाहकांमध्ये तीव्र नाराजी असून, प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी युनियनच्या वतीने करण्यात आली.

युनिटी सिक्युरिटी फोर्सच्या म्हणण्यानुसार, दोन वर्षांपूर्वी वाहकांना बोनस देताना चुकून जास्त रक्कम देण्यात आली होती. मात्र, या कथित अतिरिक्त रकमेच्या वसुलीसाठी युनिटी सिक्युरिटी फोर्सकडून गेल्या अनेक महिन्यांपासून वाहकांच्या वेतनातून मनमानी



पद्धतीने कपात केली जात असल्याचा आरोप युनियनने केला आहे. विशेष म्हणजे, संबंधित वाहकांना कोणतीही पूर्वकल्पना न देता आणि कपातीचा सविस्तर हिशेब न देता ही कारवाई सुरू असल्याचे युनियनचे म्हणणे आहे. या अन्यायकारक वेतनकपातीविरोधात युनियनने पत्राद्वारे परिवहन सभापती मंगला खेकरे तसेच चलो मोबिलिटी प्रशासनाकडे तक्रार केली होती. मात्र, नागपूर महानगरपालिका प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष न देता हात झटकले, असा आरोप युनियनने केला. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे वाहकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, अखेर आपल्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी वाहकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे युनियनने स्पष्ट केले. वेतनातून करण्यात येणाऱ्या कपातीबाबत पारदर्शकता ठेवावी, संबंधित वाहकांना योग्य हिशेब द्यावा आणि या प्रकरणात प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून न्याय द्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

प्रशासनाला तीव्र आंदोलनाचा इशारा

वाहकांच्या वेतनकपातीच्या प्रश्नावर प्रशासनाने गांभीर्याने विचार करून योग्य तोडगा काढावा. अन्यथा, आगामी काळात यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा लाल बावटा वाहतूक कामगार युनियनने दिला. या धरणे आंदोलनाच्या यशस्वितेसाठी युनियनचे अध्यक्ष कॉम्रेड गुरुप्रीत सिंह, सचिव कॉम्रेड अनिस सिरकिया, उपाध्यक्ष कॉम्रेड प्रवीण देवराव रंगारी, कोषाध्यक्ष कॉम्रेड योगेश रणदिवे यांच्यासह संतोष भाऊ रायकवार, सुनील माकडे, पुष्पा सोनबावने, चंद्रगुप्त पाणतावने, शंकर ढोके, सचिन मुळे, चहादे, युवराज बागडे, रितेश रामटेके, शकील भाई, सोपेश्वर सलाम आदी सदस्यांनी सहभाग घेतला.

जातनिहाय जनगणनेसाठी ओबीसींचा स्वतंत्र कॉलम हवा!

३० ऑक्टोबरच्या सकल ओबीसी महामोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

ओबीसी संवर्गातील सर्व जातींची जातनिहाय जनगणना करण्यासाठी जनगणनेच्या फॉर्ममध्ये ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम समाविष्ट करण्यात यावा, या मागणीसाठी सर्व शाखीय कुणबी समन्वय समिती व विविध ओबीसी संघटनांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, ३० ऑक्टोबर रोजी नागपुरात महामोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात ओबीसी बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



ओबीसी समाजाची स्वतंत्र जातनिहाय आकडेवारी उपलब्ध व्हावी आणि जनगणनेच्या अर्जात ओबीसींसाठी स्वतंत्र रकाना असावा, यासाठी सकल ओबीसी महामोर्चाच्या माध्यमातून जनआंदोलन उभारण्यात येणार आहे. या मागणीला सर्व शाखीय कुणबी समन्वय समिती, विविध ओबीसी संघटना आणि इतर सामाजिक संघटनांनी पाठिंबा दर्शविला आहे.

राष्ट्रीय स्तरावर जनगणनेची प्रक्रिया सुरू होत असताना ओबीसी संवर्गातील जातींची स्वतंत्र जातनिहाय नोंद व्हावी, यासाठी जनगणनेच्या अर्जात ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम ठेवून समाजाची जातनिहाय आकडेवारी संकलित करण्याची मागणी शासनाकडे करण्यात येणार आहे. याच पार्श्वभूमीवर महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. जातनिहाय जनगणनेच्या माध्यमातून ओबीसी समाजाची स्वतंत्र जातनिहाय आकडेवारी उपलब्ध व्हावी आणि जनगणनेच्या फॉर्ममध्ये ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम समाविष्ट करण्याच्या मागणीला बळ मिळावे, यासाठी सर्व ओबीसी बांधवांनी ३० ऑक्टोबर रोजी होणाऱ्या महामोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

हा मोर्चा चंडिका माता मंदिर, शहीद चौक, इतवारी, नागपूर येथून सुरू होऊन महाल येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत काढण्यात येणार आहे. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन देण्यात येणार आहे.

या महामोर्चाच्या माध्यमातून ओबीसी समाजाच्या प्रमुख मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात येणार असून, विविध ओबीसी संघटनांनी एकत्र येऊन या आंदोलनाला पाठिंबा व्यक्त केला आहे. याप्रसंगी पांडुरंगी वाकडे (पाटील) राजेश काकडे, दीपक कापसे, नितीन हांडे, महादेवराव बोरडे यांची उपस्थिती होती.

शब्दवेली
साहित्य विशेष
दैनिक सिंहवाणी वृत्त
५ दिनांक : गुरूवार, २९ ऑक्टोबर २०२६
Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
Epaper : epaper.sinhvani.com

स्ट्रोकचा वाढता धोका : आधुनिक जीवनशैली आणि मानसिक ताण ठरतोय जबाबदार

जागतिक स्ट्रोक दिन विशेष

डॉ. प्रितम भि. गेडाम
नागपूर

आपल्या सभोवतालचे वातावरणच काहीसे असे बनले आहे की, गेल्या काही वर्षांत जीवघेण्या आजारांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. कर्करोग, हृदयविकाराचा झटका आणि पक्षाघात अर्थात स्ट्रोक याविषयी आता दररोज ऐकावला मिळते, जणू काही हे सामान्य आजारच झाले आहेत. आधुनिक जीवनशैली आणि वाढता मानसिक ताण या आजारांना अधिक बळ देत आहेत. त्यामुळे निरोगी आणि कमी वयाची व्यक्तीदेखील अकाली गंभीर आजारांना बळी पडून आपला जीव गमावत आहे. प्रदूषण, भेसळ, अशुद्धता, बिघडत चाललेले हवामानचक्र आणि विषारी रसायनांचा वापर यांमुळे आपण आधीच मृत्यूच्या उंबरठ्यावर पोहोचत आहोत. त्यातच आधुनिक जीवनशैली आणि मानसिक ताण आपल्याला शारीरिक व मानसिकदृष्ट्या कमकुवत बनवत आहेत. शरीर आणि मन प्रसन्न व निरोगी ठेवणारे वातावरण, वस्तू आणि लोकांचे वर्तन दिवसेंदिवस कमी होत आहे. आपल्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यात व्यस्त असलेला मनुष्य स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतो.

व्यसनाधीनता, आहारात पोषक घटकांची कमतरता, पॅकबंद खाद्यपदार्थ व पेये, तळलेले, मसालेदार, गोड, खारट, मैद्याचे आणि चरबीयुक्त पदार्थ खाणे, रात्री उशिरापर्यंत जागरण करणे किंवा निद्रानाश, समाजमाध्यमांचे व्यसन, यांत्रिक साधनांवरील अवलंबित्व, सतत बसून काम करणे, व्यायामाचा अभाव, पुरेशा प्रमाणात शुद्ध प्राणवायू, पाणी आणि पोषक आहार न मिळणे, वाईट संगत किंवा वाईट सवयी, गैरवर्तन सहन करणे, मनात भीती निर्माण होणे किंवा धैर्याचा अभाव, तसेच मनात वाईट विचार येणे, या सर्व सवयींचा मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होतो आणि त्या हळूहळू माणसाला जीवघेण्या आजारांकडे ढकलतात. धूम्रपान, मधुमेह, लठ्ठपणा, उच्च रक्तदाब आणि हानिकारक कोलेस्टेरॉल यांमुळे स्ट्रोकचा धोका वाढतो. कोणताही गंभीर आजार एका दिवसात होत नाही. आजार हळूहळू वाढू लागतात; परंतु आपण त्याकडे लक्ष देणे आवश्यक समजत नाही. आपल्या जीवनशैलीत आणि कार्यपद्धतीत बदल करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर निसर्गावर होणारा प्रत्येक आघात आपल्या आरोग्यावरही परिणाम करतो, याची जाणीव असणे अत्यंत गरजेचे आहे.

दरवर्षी २९ ऑक्टोबर रोजी जगभरात जनजागृती करण्यासाठी जागतिक स्ट्रोक (पक्षाघात) दिन पाळला जातो. मेंदूशी संबंधित स्ट्रोक हा गंभीर आजार वेगाने वाढत आहे. मेंदूकडे होणारा रक्तप्रवाह थांबतो, तेव्हा स्ट्रोक होतो. मेंदूतील रक्तवाहिनीमध्ये अडथळा निर्माण झाल्यामुळे किंवा मेंदूच्या आत रक्तस्राव झाल्यामुळे ही स्थिती उद्भवते. पूर्वी हा आजार केवळ वृद्धांमध्ये आढळतो, असे मानले जात होते; परंतु आता तरुणांमध्येही हा आजार वेगाने वाढला आहे. राष्ट्रीय पक्षाघात नोंदणी कार्यक्रमानुसार, स्ट्रोकच्या प्रत्येक सात रुग्णांपैकी एक रुग्ण तरुण वयातील, कामकाजी वर्गातील असतो. म्हणजेच भारतात १४ टक्के रुग्णांचे वय ४५ वर्षांपेक्षा कमी असते. स्लीप मेडिसिन रिव्ह्यूज या नियतकालिकात २०२३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या माहितीनुसार, कामकाजाच्या वयोगटातील १०४ दशलक्ष भारतीयांना ऑब्स्ट्रक्टिव्ह स्लीप एप्निया हा आजार आहे, जो स्ट्रोकसाठी जोखमीचे घटक आहे. अमेरिकन स्ट्रोक असोसिएशननुसार, कोणत्याही



व्यक्तीला आणि कोणत्याही वयात पक्षाघात होऊ शकतो. जगभरात २५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या प्रत्येक चार प्रौढ व्यक्तींपैकी एकाला आयुष्यात कधीतरी स्ट्रोक होण्याची शक्यता असते.

२०२० ते २०२२ या कालावधीत एक संशोधन करण्यात आले. देशातील ३० रुग्णालयांमधील स्ट्रोकच्या ३४,७९२ रुग्णांचा अभ्यास करण्यात आला. त्यातून असे आढळले की, एकूण रुग्णांपैकी ६४ टक्के पुरुष आणि ३६.६ टक्के महिला होत्या. ७० टक्क्यांहून अधिक रुग्ण ग्रामीण भागातील होते. ७४.५ टक्के रुग्णांमध्ये उच्च रक्तदाब, २८.५ टक्के रुग्णांमध्ये तंबाखूचे सेवन आणि २७.३ टक्के रुग्णांमध्ये मधुमेह हे सर्वांत सामान्य जोखमीचे घटक होते. ३७.८ टक्के रुग्ण रुग्णालयात २४ तासांनंतर पोहोचले, तर केवळ २०.१ टक्के रुग्ण लक्षणे सुरू झाल्यानंतर साडेचार तासांच्या आत रुग्णालयात पोहोचले होते. स्ट्रोक आल्यानंतर तीन महिन्यांनी २७.८ टक्के रुग्णांचा मृत्यू झाला होता, जवळपास ३० टक्के रुग्ण गंभीर अपंगत्वाचे बळी ठरले होते आणि १.१ टक्के रुग्णांना पुन्हा स्ट्रोक झाला होता. स्ट्रोक आल्यास शरीराचा तोल जाणे, दृष्टीत बदल होणे, चेहऱ्याची एक बाजू झुकणे, हातात अशक्तपणा जाणवणे आणि बोलण्यात अडचण येणे अशी लक्षणे दिसू शकतात. त्यामुळे प्रत्येक मिनिट मौल्यवान समजून रुग्णाला तातडीने रुग्णालयात पोहोचवावे.

जागतिक आरोग्य संघटनेनुसार, २०२१ मध्ये स्ट्रोक हे जगभरातील मृत्यू आणि अपंगत्वाचे तिसरे प्रमुख कारण होते. त्या वर्षी स्ट्रोकची अंदाजे ९३.८ दशलक्ष प्रकरणे आढळली. २०२१ मध्ये स्ट्रोकची ११.९ दशलक्ष नवीन प्रकरणे नोंदवली गेली. गेल्या २० वर्षांत आयुष्यात कधीतरी स्ट्रोक होण्याचा धोका ५० टक्क्यांपर्यंत वाढला आहे. डिसॅबिलिटी एडजस्टेड लाइफ इयर्स या मापनपद्धतीनुसार, स्ट्रोकमुळे निर्माण होणारा जागतिक आजारभार २००० मधील १३७ दशलक्ष वर्षांवरून वाढून २०२१ मध्ये १६० दशलक्ष वर्षांपर्यंत पोहोचला आहे. स्ट्रोकच्या आजारभाराचा मोठा भाग अशा दहा जोखमीच्या घटकांशी संबंधित आहे, ज्यांत बदल करणे किंवा त्यांना नियंत्रित ठेवणे शक्य आहे. यामध्ये उच्च रक्तदाब, वायुप्रदूषण, धूम्रपान, उच्च कोलेस्ट्रॉल, सोडियमचे प्रमाण जास्त असलेला आहार, उपाशीपोटी रक्तातील ग्लुकोजचे वाढलेले प्रमाण, मूत्रपिंडाचे विकार, शरीराचे वाढलेले वजन, शारीरिक निष्क्रियता आणि मद्याचे हानिकारक सेवन यांचा समावेश होतो.

आपण इतरांना चुकीच्या गोष्टी करण्यापासून रोखू शकत नसलो, तरी स्वतःचा जीव धोक्यात घालण्यापासून स्वतःला नक्कीच रोखू शकतो. कारण आपल्याला आपल्या जीवनाची काळजी आहे. जीवन अनमोल आहे आणि ते पुन्हा मिळणार नाही. म्हणून जीवनाचा मनमुराद आनंद घ्या. शरीर आणि मन या दोन्ही दृष्टींनी स्वतःला पूर्णपणे निरोगी ठेवा. आरोग्य बिघडवणाऱ्या आधुनिक जीवनशैलीचा त्याग करा. आधुनिकता विचारांमध्ये असावी, आरोग्य बिघडवण्यात नाही. पोषक आहार घ्या, पुरेशी झोप घ्या, दररोज व्यायाम करा, धूम्रपान, मद्यपान आणि इतर व्यसनांपासून दूर राहा. तळलेले, गोड, खारट आणि चरबीयुक्त पदार्थ खाणे टाळा आणि शारीरिक हालचाली वाढवा. निसर्ग हाच जीवनाचा आधार आहे, कारण प्राणवायू, पाणी आणि अन्न ही निसर्गाचीच देणगी आहे. म्हणून निसर्गाचे रक्षण करा.

वाईट सवयी असलेल्या आणि वाईट विचार करणाऱ्या लोकांपासून दूर राहा, प्रसन्न राहा आणि चांगल्या लोकांची संगत करा. राग, द्वेष, मत्सर आणि खोटा देखावा माणसाला मानसिकदृष्ट्या कमकुवत करतात; त्यामुळे त्यांच्यावर नियंत्रण ठेवा. भावनांच्या आहारी जाणे थांबवा आणि मन व मेंदू नेहमी खंबीर ठेवा. कोलेस्टेरॉल, रक्तदाब आणि मधुमेह नियंत्रणात व सामान्य पातळीवर ठेवा. अशी जीवनशैली आपल्याला अनेक आजारांपासून वाचवते. आरोग्यदायी आहार, चांगले संस्कार, समाधानी मन आणि मानसिक शांतता या सुखी जीवनाच्या गुरुकिल्ल्या आहेत. स्ट्रोक आल्यास रुग्णाच्या शारीरिक लक्षणांकडे लक्ष द्या. वैद्यकीय मदतीसाठी तातडीने आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधा. रुग्णाचे घट्ट कपडे सैल करा, जेणेकरून त्याला श्वास घेण्यास सोपे जाईल. रुग्णाला खाण्यासाठी किंवा पिण्यासाठी काहीही देऊ नका. शक्य असल्यास रुग्णाला रुग्णवाहिकेतूनच रुग्णालयात घेऊन जा. त्याचा श्वास आणि नाडी तपासा.

रुग्णाचा श्वास थांबला किंवा तो बेशुद्ध झाला आणि तुम्हाला सीपीआर देण्याचे प्रशिक्षण असेल, तर त्वरित सीपीआर देण्यास सुरुवात करा. कोणताही आजार झाल्यानंतर उपचार करण्यापेक्षा तो होऊ नये यासाठी आधीच प्रतिबंधात्मक उपाय करणे अधिक चांगले. तरीही आजार झाल्यास त्वरित रुग्णालयात जाऊन योग्य उपचार करून घ्या. कोणत्याही परिस्थितीत घाबरू नका, स्वतःचे मनोबल टिकवून ठेवा आणि रुग्णालाही धीर द्या.

(महाराष्ट्र शासनाद्वारे पुरस्कृत लेखक)
- ०८२३७४१७०४१

ॲनिमेशन : दृष्टीभ्रम-आभास निर्माण करण्याची एक कला व तंत्रज्ञान

कृष्णकुमार निकोडे
गडचिरोली

आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन दिन दरवर्षी २८ ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो. या दिवसाचे उद्दिष्ट ॲनिमेशन या कलेचे महत्त्व ओळखणे आणि त्यातील सर्जनशीलतेचा उत्सव साजरा करणे आहे. सन १८९२ मध्ये एमिल रेनॉड यांनी पहिल्यांदा पब्लिक ॲनिमेशन शो सादर केला होता, ज्याचा सन्मान करण्यासाठी हा दिवस पाळला जातो.

ॲनिमेशन ही एक शक्तिशाली कला आहे जी विविध संस्कृती, कथा, आणि कल्पना जगभरातील प्रेक्षकांसमोर सादर करते. लहान मुलांसाठीच्या कार्टूनपासून ते प्रौढांसाठीच्या चित्रपटांपर्यंत ॲनिमेशनचे क्षेत्र विशाल आहे, आणि त्यामधील तांत्रिक प्रगतीमुळे या माध्यमाने मनोरंजन आणि शिक्षण क्षेत्रात महत्त्वाची जागा मिळवली आहे. या दिवशी जगभरात ॲनिमेशन फिल्म फेस्टिव्हल्स, कार्यशाळा, आणि प्रदर्शनं आयोजित केली जातात, ज्यामध्ये कलाकार, विद्यार्थी आणि प्रेक्षक एकत्र येऊन ॲनिमेशनच्या विविध प्रकारांचा आनंद घेतात. आंतरराष्ट्रीय ॲनिमेशन दिन हा सर्जनशीलतेचा उत्सव असून, त्याद्वारे कलाकारांच्या कल्पनाशक्तीला आणि मेहनतीला सन्मान दिला जातो.

ॲनिमेशन म्हणजे स्थिर चित्रे किंवा आकृत्यांना एकामागून एक ठराविक वेगाने समोर आणून त्यात हालचाल असल्याचा दृष्टीभ्रम किंवा आभास निर्माण करण्याची एक कला व तंत्रज्ञान आहे. ॲनिमेशन कसे काम करते:१) पडद्यावर एका सेकंदात सामान्यपणे २४ किंवा त्याहून अधिक चित्रे खूप वेगाने दाखवली जातात. २) मानवी डोळा आणि मेंदू या वेगाने बदलणाऱ्या चित्रांना एकसलग हालचाल म्हणून पाहतो. ३) या चित्रांना योग्य आवाज, संगीत आणि संवाद जोडले की ती दृश्ये जिवंत वाटतात.

ॲनिमेशनचे मुख्य प्रकार : पारंपारिक ॲनिमेशन : यात हाताने पारदर्शक कागदावर किंवा शीटवर चित्रे काढून एक-एक करून त्यांचे छायाचित्रण केले जाते. संगणक-व्युत्पन्न ॲनिमेशन : यात कॉम्प्युटर सॉफ्टवेअरचा वापर करून २डी किंवा ३डी पात्रे आणि विश्व तयार केले जाते.

स्टॉप मोशन : प्रत्यक्ष भौतिक वस्तू किंवा बाहुल्या वापरून त्यांच्या स्थितीत अगदी लहान बदल करून फोटो घेतले जातात. ॲनिमेशनचे उपयोग: १) मनोरंजन: कार्टून शो, चित्रपट आणि वेब सिरीज. २) जाहिरात: टीव्ही किंवा सोशल मीडियावरील आकर्षक ॲनिमेटेड जाहिराती. ३) शिक्षण : किचकट विषय सोप्या पद्धतीने समजून सांगण्यासाठी ॲनिमेटेड व्हिडिओ. ४) गेमिंग: व्हिडिओ गेम्समधील पात्रे आणि त्यांचे विश्व तयार करण्यासाठी.

ॲनिमेशनमधील करिअरची संधी: आजच्या डिजिटल युगात ॲनिमेशन क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत: कोर्सची माहिती: १२ वी नंतर वा पदवी स्तरावर ॲनिमेशन आणि व्हीएफएक्सचे विविध डिप्लोमा व डिग्री कोर्सेस करता येतात.

जलद गतीने स्थीर चित्रे दाखवून हालचालीचा भ्रम निर्माण करण्याला ॲनिमेशन म्हटले जाते. ॲनिमेशन ही एक अशी पद्धत आहे ज्यात हलत्या प्रतिमांसारखे दिसण्यासाठी आकृती हाताळली जाते. पारंपारिक ॲनिमेशनमध्ये, छायाचित्रण करण्यासाठी आणि चित्रपटासाठी प्रदर्शन करण्यासाठी पारदर्शक सेल्युलायड शीटवर हाताने प्रतिमा रेखाटल्या किंवा रंगविल्या जातात. आज बहुतेक ॲनिमेशन संगणक-व्युत्पन्न प्रतिमा (सीजीआय) सह बनविल्या जातात. संगणक ॲनिमेशन अतिशय थ्रीडी एनिमिशन असू शकते, तर २ डी संगणक ॲनिमेशन स्टाईलिस्टिक कारणास्तव, कमी बँडविड्थ किंवा वेगवान रिअल-टाइम रेंडरिंगसाठी वापरले जाऊ शकते. इतर सामान्य ॲनिमेशन पद्धती पेपर कटआउट्स, कठपुतळी किंवा चिकणमातीच्या आकृत्यांसारख्या दोन आणि त्रिमितीय वस्तूंवर स्टॉप मोशन तंत्र लागू करतात.

ॲनिमेशनमध्ये व्यवसाय : ॲनिमेशन आणि गेमिंगमधील पदविका अभ्यासक्रम शिकणारा विद्यार्थी ग्राफिक डिझाइनर, वेब डिझायनर, २ डी / ३ डी निमेटर, २ डी / ३ डी डिझायनर, एव्हीएडिटर, टेक्निकल ट्रेनर, ३ डी मॉडेलर, मल्टीमीडिया प्रोग्रामर, कंपोझिटर, व्हिज्युअलायझर्स, कंटेंट डेव्हलपर सारख्या नोकरीच्या भूमिकेचा पाठपुरावा करू शकतो.

व्युत्पत्ती: "ॲनिमेशन" हा शब्द लॅटिनच्या "निमेटिअन" शब्दापासून बनलेला आहे. इंग्रजी शब्दाचा प्राथमिक अर्थ "चैतन्य" आहे आणि "फिरत्या प्रतिम माध्यम"च्या अथापेक्षा जास्त काळ वापरात आला आहे. आपल्याकडे प्राचीन काळापासून लोककलांमध्ये कळसूत्री बाहुल्या, बोलक्या बाहुल्यांचा समावेश आहेच. आजच्या काळातील आधुनिक रोबोटिक सायन्स, ॲनिमेशन यांची बीजे अशाच लोककलांमध्ये दडलेली आहेत. ॲनिमेशनचे तंत्रज्ञान आधुनिक असले तरी त्यासाठी आवश्यक असलेली प्रतिभा भारतीयांमध्ये अंगभूतच आहे. यामुळेच आज जागतिक स्तरावर ॲनिमेशन क्षेत्रात भारतीयांची घोडदौड अतिशय वेगाने सुरू आहे.हॉलिवूड चित्रपटांमधील ॲनिमेशनचे बरेचसे काम भारतात केले जाते. ॲनिमेशन हा शब्द ॲनिमा या लॅटिन शब्दापासून तयार झाला आहे. त्याचा अर्थ आहे प्राण. एखाद्या निर्जीव वस्तूत प्राण ओतून ती जिवंत करणे हे त्यातून प्रतीत होते. ॲनिमेशनची नेमकी व्याख्या करायची असल्यास हलणारी चित्रे अशी करता येईल. अगदी खऱ्या जगासारखे एक आभासी जग निर्माण करून प्रेक्षकांना त्यात खेचून घेणे ही जादू ॲनिमेशनच्या माध्यमातून साकारली जाते. एका सेकंदात २४ चित्रे पडद्यावर एकामागून एक अशी वेगाने सरकवली गेल्यास त्या चित्रामध्ये हालचाल होत असल्याचा आभास निर्माण होतो. तो दृष्टीभ्रम असतो. त्या चित्रांना ध्वनीची जोड मिळाली, तर पडद्यावरची चित्रे जिवंत होतात. ॲनिमेशन हे हकश्राव्य माध्यम आहे. ॲनिमेशनचे अनेक प्रकार असतात, पण मुख्य दोन प्रकार म्हणजे- (१) ट्रॅडिशनल ॲनिमेशन (पारंपरिक) आणि (२) सीजी ॲनिमेशन (कंप्युटर जनरेटेड ॲनिमेशन). पारंपरिक ॲनिमेशनमध्ये एका सेकंदाला २४ फ्रेम या दराने प्रत्येक चित्र हाताने रेखाटले जाते व त्या चित्रांचे फिल्ममध्ये रूपांतर केले जाते. हे काम अत्यंत अवघड आणि चिकाटीचे आहे. आजदेखील काही खास प्रकल्पांमध्ये पारंपरिक ॲनिमेशनचा आवर्जून वापर केला जातो. कंप्युटर जनरेटेड ॲनिमेशनमध्ये- १) टूडी- २ डी ॲनिमेशन आणि थ्रीडी- ३ डी ॲनिमेशन असे दोन प्रकार आहेत. याशिवाय स्टॉप मोशन, क्लेमेशन, पपेट ॲनिमेशन, कटआउट ॲनिमेशन असे इतरही प्रकार आहेत. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी !

- ९६९९८३६७१७

आशा स्वयंसेविकांचा 'नवदुर्गा सन्मानपत्र' देऊन गौरव

जनजागृती सेवा संस्थेचा उपक्रम, आरोग्य क्षेत्रातील योगदानाचा केला सन्मान

दै. सिंहवाणी वृत्त, बदलापूर

नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेच्या कार्यरत आशा स्वयंसेविकांचा नवदुर्गा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. संयोग अपार्टमेंट, झेंडा चौक, बदलापूर पश्चिम येथे हा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. समता साहित्य अकादमी महाराष्ट्राचे अध्यक्ष तथा राष्ट्रपती पदक सन्मानित दिलीप नारकर आणि जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांच्या हस्ते आशा स्वयंसेविकांना आकर्षक पेन, गुलाबपुष्प आणि नवदुर्गा सन्मानपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले. आरोग्य सेवेच्या माध्यमातून समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचून नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या आशा स्वयंसेविकांच्या कार्यप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

यावेळी दिलीप नारकर यांनी आरोग्य विभागातील शासन निर्णय, आशा स्वयंसेविकांच्या विविध मागण्या आणि त्यांच्या प्रश्नांबाबत शासनाची भूमिका याविषयी मार्गदर्शन केले. आशा स्वयंसेविकांच्या न्याय्य मागण्यांसाठी संघटितपणे प्रयत्न करण्याची गरज अधोरेखित करताना, शासनाकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्यास कायदेशीर मागनि संघर्ष कसा करावा, याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी जनजागृती सेवा संस्थेच्या कार्याचा आढावा देत संस्थेच्या आगामी वाटचालीविषयी माहिती दिली. ज्येष्ठ आशा स्वयंसेविका संजीवनी पाटील यांनी आपल्या प्रदीर्घ कार्यकाळातील अनुभव कथन केले. आशा स्वयंसेविका ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिकांना आरोग्यविषयक सेवा उपलब्ध करून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. माता-बाल आरोग्य, आरोग्यविषयक जनजागृती आणि शासकीय आरोग्य योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांचे योगदान मोलाचे असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, नवरात्रोत्सवाच्या काळात संस्थेच्या वतीने ऑनलाइन पद्धतीनेही महिलांना ई-नवदुर्गा सन्मानपत्र पाठविण्यात आले. महिलांच्या कार्याचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमाचे महत्त्व यानिमित्ताने अधोरेखित झाले. अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.



थोडक्यात

दोन खून आणि दरोड्याच्या गुन्ह्यांत वर्षानुवर्षे फरार असलेला कुख्यात गुन्हेगार नागपूर गुन्हे शाखेकडून जेरबंद



दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

दोन वेगवेगळ्या खुनांच्या घटनांसह जबरी चोरीच्या गंभीर गुन्ह्यांमध्ये वर्षानुवर्षे पोलिसांना चकमा देणाऱ्या एका अट्टल गुन्हेगाराला नागपूर शहर गुन्हे शाखेच्या युनिट क्रमांक ६ ने अखेर बेड्या ठोकल्या आहेत. प्रशांत उर्फ सोनू शंकर चौधरी (वय ३४, रा. दत्तनगर, चणकापूर, ता. सावनेर, जि. नागपूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपी प्रशांत चौधरी याच्यावर नागपूर आणि वर्धा जिल्ह्यात गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे तो खापरखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील २०२१ मधील खुनाच्या गुन्ह्यात पाहिजे होता तर याच ठाण्यातील २०१९ मधील जबरी चोरीच्या गुन्ह्यात त्याच्याविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट जारी झाले होते. तसेच वर्धा जिल्ह्यातील देवळी पोलीस ठाण्याच्या हद्दीत २०१५ मध्ये घडलेल्या खून आणि अपहरण प्रकरणातील अजामीनपात्र वॉरंटमध्ये तो मागील नऊ वर्षांपासून पोलिसांच्या हाती लागत नव्हता.

गुन्हे शाखा युनिट ६ चे पथक हद्दीत गस्त घालत असताना गोपनीय बातमीदाराकडून मिळालेली माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून प्रशांत चौधरीला ताब्यात घेतले. पोलिसांनी कसून चौकशी केली असता त्याने या सर्व गुन्ह्यांत आपला सहभाग असल्याची कबुली दिली. आरोपीची वैद्यकीय तपासणी करून पुढील कायदेशीर कारवाईसाठी त्यास सर्व कागदपत्रांसह खापरखेडा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे ही धडक कारवाई गुन्हे शाखा युनिट ६ चे पोलीस निरीक्षक भरत कऱ्हाडे व त्यांच्या पथकाने पार पाडली.

चाचेर येथील पीएमश्री शाळेत एआय लॅबचे उद्घाटन



सरपंचा लुबिनी महेश कलारे यांच्या हस्ते उद्घाटन; विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या शिक्षणाची नवी संधी

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साह : मौदा

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान मिळावे, त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा आणि डिजिटल शिक्षणाला चालना मिळावी, या उद्देशाने पी.एम.श्री. उच्च प्राथमिक जिल्हा परिषद शाळा, चाचेर येथे पीएमश्री योजनेंतर्गत उभारण्यात आलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) लॅबचे उद्घाटन सरपंचा लुबिनी महेश कलारे यांच्या हस्ते करण्यात आले. या एआय लॅबमध्ये संगणक व लॅपटॉप, रोबोटिक्स किट, सेन्सर व इलेक्ट्रॉनिक साहित्य, स्मार्ट बोर्ड तसेच इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. या सुविधांमुळे विद्यार्थ्यांना संगणक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रोबोटिक्स यांची ओळख करून घेण्याची संधी मिळणार आहे.

आजच्या डिजिटल युगात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे महत्त्व वाढत आहे. विद्यार्थ्यांना शालेय स्तरापासूनच या तंत्रज्ञानाची माहिती मिळाल्यास त्यांच्यात तर्कशक्ती, सर्जनशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित होण्यास मदत होईल. एआय लॅबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोग, प्रात्यक्षिके आणि कृतीआधारित शिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे. या उद्घाटनप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जीवन सहारे, उपाध्यक्ष शुभांगी आंबीलढुके, माजी सरपंच महेश कलारे, किरण बरबटे, शैलेश कोपरकर, रामकृष्ण आंबीलढुके, योगेश निनावे, ठोसरे, चौरे, थोटे उपस्थित होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक अनिल गडपायले, शिक्षकवृंद रविंद्र घुगे, भारती साखरकर, कु. परवीन शेख, प्रीती खंगार, शिल्पा उकुडू, नेहा निमजे, रुचिला खंडाईत, संगीता बालकोटे यांच्यासह शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पीएमश्री योजनेंतर्गत उपलब्ध झालेली ही सुविधा ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी आधुनिक शिक्षणाचे नवे दालन खुले करणारी ठरणार आहे. या उपक्रमामुळे शाळेच्या शैक्षणिक विकासाला चालना मिळणार असून, विद्यार्थ्यांना भविष्यातील तंत्रज्ञानाधारित शिक्षणासाठी तयार होण्यास मदत होणार आहे. चाचेर शाळेत अक्र(एआय) लॅब सुरू झाल्याने ग्रामीण विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या शिक्षणाची नवी संधी उपलब्ध झाली आहे.

पीएमश्री योजनेअंतर्गत आपल्या चाचेर शाळेला एआय लॅबची सुविधा उपलब्ध होणे ही अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. या लॅबमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, रोबोटिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचे ज्ञान मिळण्यास मदत होईल. आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी भविष्यात तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रगती करावी आणि शाळेचे नाव उज्ज्वल करावे, हीच अपेक्षा आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा व्यवस्थापन समिती नेहमीच सहकार्य करेल, असे जीवन सहारे, अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती, चाचेर यांनी सांगितले.

'गझल ही कविता असते; पण प्रत्येक कविता गझल नसते'

'गझल-आख्यान'मधून डॉ. आशीष मुजुमदार यांनी उलगडले गझलेचे व्याकरण, अर्थसौंदर्य आणि गायकीचे बारकावे

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

'गझल ही कविता असते; पण प्रत्येक कविता गझल नसते,' या विधानातून गझलेचे स्वतंत्र स्वरूप स्पष्ट करत प्रसिद्ध संगीत-दिग्दर्शक डॉ. आशीष मुजुमदार यांनी गझलेचे तंत्र, तिचे व्याकरण, शब्दांचे सौंदर्य आणि गायकीतील बारकावे उलगडले. अरुणाई आणि सप्तक यांच्या वतीने आयोजित ह्यगझलझआख्यानह्ण या विशेष कार्यक्रमात त्यांनी व्याख्यान आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून गझलेच्या अंतरंगाचा वेध घेतला. बुधवारी दक्षिण अंबाझरी रोडवरील अंध विद्यालयाच्या मुंडले सभागृहात हा कार्यक्रम झाला.

गझल हा अन्य काव्यप्रकारापेक्षा वेगळा असून तिची रचना विशिष्ट नियमांवर आधारित असते. गझलेतील प्रत्येक शेर स्वतंत्र अर्थपूर्ण असतो. वेगवेगळ्या विषयांवरील शेर एका गझलेत एकत्र येत असले, तरी त्यांना वृत्तबद्धता, काफिया आणि रदीफ यांसारखे रचनात्मक घटक एकत्र बांधतात. सर्व शेर एकाच विषयाभोवती गुंफलेले असतील,



तर त्या रचनेला मुसलसल गझल म्हणतात, असे त्यांनी स्पष्ट केले. गझलेतील शेराचा अर्थ प्रत्येक रसिक आपल्या अनुभवांनुसार वेगवेगळ्या प्रकारे लावू शकतो. त्यामुळे गझलेचा आस्वाद घेताना तिच्या शब्दांचा भावार्थ आणि त्यामागील आशय समजून घेणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

गझल समजून घेण्यासाठी केवळ तिच्या चालीचा किंवा सुरांचा आनंद घेणे पुरेसे नाही, तर शब्दांची निवड, त्यांची मांडणी आणि त्यातून व्यक्त होणाऱ्या भावना समजून घेणे आवश्यक आहे. काफिया, रदीफ, बहर आणि मक्ता यांसारख्या संज्ञांचे महत्त्व स्पष्ट करताना त्यांनी गझलेच्या रचनात्मक वैशिष्ट्यांकडे रसिकांचे लक्ष वेधले. गझलेतील एखादा शेर स्वतंत्रपणेही अर्थपूर्ण ठरतो आणि त्यातून मानवी स्वभाव, नातेसंबंध तसेच जीवनातील विविध अनुभव व्यक्त होऊ शकतात, असे त्यांच्या विवेचनातून अधोरेखित झाले.

गीत आणि गझल यांतील फरक स्पष्ट करताना त्यांनी लोकप्रिय हिंदी गीतांचे संदर्भ दिले. रस्में उल्फत को निभाएं तो निभाएं कैसे? हर तरफ प्यार है, दामन को बचाएं कैसे? या गीताच्या ओळींच्या माध्यमातून शब्दांचा अर्थ, त्यांचा उच्चार आणि भावानुरूप सादरीकरण यांचे महत्त्व त्यांनी विशद केले. केवळ सुरात आणि तालात गाणे सादर करणे म्हणजे त्या गाण्याचा आशय प्रभावीपणे व्यक्त करणे नव्हे. गायकाने शब्दांचा अर्थ समजून घेऊन त्यातील भावभावना आपल्या गायकीतून व्यक्त करणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

संगीत सादरीकरणात शब्द, सूर, ताल आणि भाव यांचा योग्य मेळ साधणे गरजेचे असते. गाण्याची स्वतःची शैली जपत त्याच्या मूळ भावनेला न्याय देणे, हे कलाकारासाठी महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांच्या रंजक विवेचनामुळे रसिकांना गझलेच्या साहित्यिक आणि सांगीतिक पैलूंचा जवळून परिचय झाला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. उदय गुप्ते यांनी केले. यावेळी सप्तकचे विलास मानेकर, प्रमोद कळभकर, श्रीकांत देशपांडे, प्रदीप मुनशी, विकास लिमये, उदय पाटणकर, निनाद मानेकर, राजाभाऊ हिवरकर आणि गौरव बेलसरे यांच्यासह संगीतप्रेमी रसिक उपस्थित होते.

'हिट्स ऑफ शाहरुख खान अँड माधुरी दीक्षित' संगीतमय कार्यक्रम में सुरों की सजी महफिल

दै. सिंहवाणी वृत्त, नागपुर

स्वरतरंग और स्वरांकुर के संयुक्त तत्वावधान में हिट्स ऑफ शाहरुख खान अँड माधुरी दीक्षित नामक विशेष संगीतमय कार्यक्रम का आयोजन बुधवार को शाम शंकरनगर स्थित साई हॉल में किया गया। बॉलीवुड के लोकप्रिय अभिनेता शाहरुख खान और अभिनेत्री माधुरी दीक्षित पर फिल्माए गए चर्चित गीतों को सुनने और संगीत का आनंद लेने के लिए बड़ी संख्या में संगीतप्रेमी उपस्थित थे।

कार्यक्रम की शुरूआत डॉ. पूजा पाठक, सोनम दाभेकर, डॉ. नंदा राठी और निरंजन बोबडे के हस्ते दीप प्रज्वलन से हुई। इस अवसर पर प्रसिद्ध गायक निरंजन बोबडे ने मितवा, मैं कोई ऐसा गीत, रुक जा ओ दिल दीवाने, ये दिल दीवाना, भोली सी सूरत, प्यार कर, कल हो ना हो, तुमसे मिलके दिल का, हवाएं और जादू तेरी नजर जैसे लोकप्रिय गीतों की प्रस्तुति दी। वहीं, गौरी शिंदे ने दीदी तेरा देवर, ओ रामजी बड़ा दुख, घर मोरे परदेसिया, एक दो तीन और मेरा पिया घर आया अश्विन भोकरे ने जनम देख लो, तेरे लिए, तौबा तुम्हारे ये, बड़ी मुश्किल है अनिल गुल्हाने ने ये काली काली आखे जैसे गीतों से समां बांधा।

इसके साथ ही कलाकारों ने युगल गीतों की भी शानदार प्रस्तुतियां दीं। इनमें काहे छेड़छेड़, मैं अगर कहूं, चल छैयां छैयां, तू यार तू ही दिलदार, कोई मिल गया और धूम ताना जैसे लोकप्रिय गीत शामिल थे। शाहरुख खान और माधुरी दीक्षित पर फिल्माए गए इन सदाबहार गीतों की मधुर प्रस्तुतियों ने श्रोताओं को मंत्रमुग्ध कर दिया। संगीत प्रस्तुतियों के दौरान वाद्यवृंद पर संगत देने के लिए परिमल जोशी, आशीष गायगोले, गौरव ताम्हणकर, रितेश त्रिवेदी, अक्षय हरले, दीपक कांबळे, पंकज यादव और विदेश बोबडे उपस्थित थे। उनकी शानदार संगत ने गीतों की खूबसूरती को और बढ़ाया तथा कार्यक्रम में चार चांद लगा दिए। कार्यक्रम का संचालन धनश्री सेवारकर ने किया। शाहरुख खान और माधुरी दीक्षित के लोकप्रिय गीतों से सजी यह संगीतमय शाम संगीतप्रेमियों के लिए यादगार रही।



'वर्णावी ती थोरी ब्रह्मचैतन्याची' संगीतमय कार्यक्रम १ नोव्हेंबर रोजी

नामसाधना परिवार आणि श्रीराम हनुमान मंदिर ट्रस्टतर्फे आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नामसाधना परिवार, नागपूर आणि श्रीराम हनुमान मंदिर ट्रस्ट, जयप्रकाश नगर यांच्या संयुक्त विद्यमाने 'वर्णावी ती थोरी ब्रह्मचैतन्याची' या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन रविवार, १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता जयप्रकाश नगर येथील श्रीराम हनुमान मंदिराच्या प्रांगणात करण्यात आले आहे. या कार्यक्रमातून श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या दिव्य चरित्राचा काव्यबद्ध आलेख संगीताच्या माध्यमातून सादर केला जाणार आहे. या कार्यक्रमाचे संयोजन व निवेदन प्रफुल्ल माटेगावकर हे करणार असून संगीत सुरसरिता यामिनी पायधन यांचे आहे. गायक सारंग जोशी, आनंद चिमोटे, वैशाली उपाध्ये आणि सुरसरिता यामिनी पायधन यांचा यात सहभाग असून शिरीष भालेराव, अरविंद उपाध्ये, गोविंद गढीकर, श्रीकांत पिसे, वेद ढोक, हर्षद पायधन आणि विक्रम जोशी हे वादक साथसंगत करणार आहेत. कार्यक्रमाची सांगता मंदिरातील आरतीने होणार आहे.

श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांना महाराष्ट्रात विशेष मानाचे स्थान असून, त्यांना नामावतार आणि प्रेमावतार असेही संबोधले जाते. त्यांची अचल शांती, गुरुप्राप्तीसाठीची तळमळ, देशभर भ्रमण करून केलेला नामजागर, त्यासाठी सोसलेले कष्ट आणि सर्वांप्रती असलेली समदृष्टी यांसह त्यांच्या जीवनातील निवडक भावपूर्ण प्रसंग या कार्यक्रमातून उलगडणार आहेत. या विनामूल्य भक्तिमय कार्यक्रमाला कुटुंबीय, मित्रपरिवारासह उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

राष्ट्रकल्याण करणारे महान संत म्हणजे राष्ट्रसंत : प्रा. विजय दाते



दै. सिंहवाणी वृत्त, श्रीरामपूर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना मी अमरावतीला पाहिले होते त्यांचे कार्य चारी दिशांनी व्याप्त होते, समाजात समरस होऊन रचनात्मक कार्य त्यांनी केले लोक त्यांच्याकडे आकर्षित होत लाखोंची गर्दी त्यांच्या भजनात तल्लीन व्हायची चरित्रयुक्त संघटनेच्या अधिष्ठानावर त्यांनी देव हा देश व सेवा ही भक्ती असे कार्य केले सामुदायिक प्रार्थना ही विश्वशांतीची साधना आहे असे प्रतिपादन प्रा. विजय दाते यांनी केले.

गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूर वतीने पुसद तालुक्यात विविध ठिकाणी सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना व भजन संध्या उपक्रमास उस्फुर्त प्रतिसाद मिळत असून यावेळी पी.एस. आय. अनिल यादवराव नेमाडे यांच्या निवासस्थानी सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली यावेळी भीमराव वानखडे, जितेंद्र किन्हेकर, खुशाल सोनोने, अजिंक्य नेमाडे मंडळाचे अध्यक्ष गणेश धमाळे प्रामुख्याने उपस्थित होते सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते अधिष्ठान पूजन करून दुर्गा मातेच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. स्मिता धर्माळे यांच्या आदेशावरून शिस्तबद्ध सामुदायिक प्रार्थना,अर्जोपद, नामधून, नामजप, शांतिपाठ, आत्मचिंतन, सामूहिक नमस्कार घेण्यात आला यावेळी दाते पुढे म्हणाले की राष्ट्रसंतांचे विचार आपणास विश्व विनाशातून वाचवू शकतात,जनतेला नैतिक आणि सामुदायिक मार्गावर आणण्याचे प्रभावी साधन सामुदायिक प्रार्थना आहे श्रीरामपूर येथील गुरुदेव सेवा मंडळाचा संकल्प सिद्धीस जाईल यात शंकाच नाही महाराजांच्या कार्याच्या प्रसार प्रचाराने जीवन धन्य होईल यावेळी त्यांनी महाराजांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

यानंतर भजनांचा बहारदार कार्यक्रम संपन्न झाला हार्मोनियम अशोक भगत महाराज,यशवंत भगत,किसन गरडे, तबला अनिल अस्वार, किशोर राऊत खंजिरी सुरेश कदम यांनी तर साथसंगत पुंडलिक भालेराव कैलास मस्के पंजाब गडदे श्यामराव देशमाने सुभाष राऊत बाबासाहेब वाघमारे साहेबराव सरकटे महिला प्रतिनिधी मुक्ता काळबांडे, रंजना किन्हेकर, मीना वानखडे, कमल गडदे,डॉ देवश्री काळबांडे यांनी केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रंजना नेमाडे, वैष्णवी नेमाडे, माधुरी अडणे, श्वेता वानखेडे, सिदेश वानखेडे, वैष्णवी वानखेडे, गजानन गव्हाणकर, यांनी अथक परिश्रम घेतले.

महाआरती, अल्पोपहार, राष्ट्रवंदना, जयघोषाने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी असंख्य स्त्री पुरूष आबालवृद्ध मोठया संख्येने उपस्थित होते.

हेटी येथे शाळकरी विद्यार्थ्यांसाठी बस थांबविण्याची मागणी!

बस जातात, मात्र थांबत नसल्याचा विद्यार्थी व पालकांचा आरोप

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

सावनेर तालुक्यातील हेटी गाव परिसरात शाळकरी मुला-मुलींना बससेवेच्या समस्येला सामोरे जावे लागत असल्याची तक्रार समोर आली आहे. बस रस्त्यावरून जातात, मात्र विद्यार्थ्यांना घेण्यासाठी थांबत नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुढील बससाठी एक ते दीड तास प्रतीक्षा करावी लागत असल्याचे सांगण्यात येत आहे.

बस वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत पोहोचण्यास उशीर होतो. काही वेळा उशिरा पोहोचल्याने विद्यार्थ्यांना शाळेतून परत पाठवले जात असल्याची



तक्रारही आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानाची शक्यता निर्माण झाली आहे.दरम्यान, हेटी परिसरातील वर्दळीच्या रस्त्यावर अवजड ट्रक उभे राहत असल्यामुळे तेथील बसथांबा झाकला जातो. परिणामी, बसचालकांना बसथांबा आणि तेथे उभे असलेले विद्यार्थी स्पष्टपणे दिसण्यास अडथळा निर्माण होऊ शकतो. या रस्त्यावर अपघाताचा धोका लक्षात घेता विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. या ठिकाणी महामार्ग पोलिसांनी यापूर्वी ट्रकवर कारवाई केल्याची माहिती आहे.

या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते तथा रुग्णसेवक आणि मृत्युंजय दूत हितेश बनसोड यांनी एसटी महामंडळ, संबंधित प्रशासन आणि महामार्ग पोलिसांनी या समस्येची तातडीने दखल घेण्याची मागणी केली आहे.

शाळकरी विद्यार्थी बसथांब्यावर उभे असल्यास संबंधित बसने निर्धारित थांब्यावर थांबून विद्यार्थ्यांना बसमध्ये घेण्याबाबत आवश्यक सूचना द्याव्यात. तसेच शाळेच्या वेळेनुसार बसफेऱ्यांचे नियोजन करावे, बसथांब्यासमोरील अवजड वाहनांची समस्या दूर करावी आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी हितेश बनसोड यांनी केली आहे.

शाळेच्या वेळेवर हेटी वरुण सावनेर कडे व सावनेर कडून हेटी मार्ग होत पुढे जाणाऱ्या बसेस ला हेटी बसस्थानकावर थांबविण्यात यावे तसेच तालुक्यातील कुठल्याही बसस्थानकावर विद्यार्थी दिसल्यास त्यांना बसमध्ये घेण्यात यावे अश्या सुचना आगार प्रमुखांनी आपल्या वाहन चालकांना द्याव्याच जेणेकरून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी रोज संघर्ष करावा लागू नये आणि बसअभावी त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, सावनेर तालुक्यातील रस्त्यावर उभे असलेले विद्यार्थी दिसले असता तर त्यांचा साठी बस थांबवावे यासाठी संबंधित यंत्रणांनी तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा हितेश बनसोड यांनी व्यक्त केली आहे.सदर विषयावर आमचे स्थानिक प्रतिनिधींनी सावनेर आगार प्रमुखांना फोनवर दोन तीन दा संपर्क केला असता त्यांनी फोन उचलण्याचे सोपस्कार केले नाही व फोन बंद करुन दिला. त्यानंतर आमच्या प्रतिनिधीने प्रत्यक्षात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सावनेर आगारातील आगार प्रमुखांच्या कक्षाला भेट दिली असता आगार प्रमुख तेथेही उपस्थित मिळाले नाही.

या संदर्भात विचारना केली असता अनेकांनी आपले नाव पुढे येऊ न देण्याच्या अटीवर सांगितले की भाऊ इथं असच सुरु असल्याची माहीती दिली. तर आगार प्रमुख उपस्थित नसल्याने त्यांचे मत घेता आले